गुरुवार, 01 सप्टेंबर 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 34
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 01 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-34 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## अमेरिका, चीनच्या तुलनेत भारतात महागाई कमी : डॉ. भागवत कराड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** देशातील महागाईने नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यातच सण-उत्सव सुरू झाले असून महागाईने होरळपणाऱ्या नागरिकांना खर्चाचा मेळ बसवण्यासाठी कसरत करावी लागत आहे. त्यातच सरकारने अनेक खाद्यपदार्थांवर जीएसटी लागू केला आहे. त्यामुळे महागाईचा भडका उडाला आहे. हाच धागा पकडून राष्ट्रवादी काँग्रेसचने नेते एकनाथ खडसे यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे. त्याला केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांनी प्रत्युत्तर देत अमेरिका आणि चीनचे उदाहरण दिले आहे.

एकनाथ खडसे म्हणाले की, महागाईमुळे गणेशोत्सवाचा आनंदही राहिला नाही. तसेच उत्साह राहिला नाही. गणेशोत्सवासाठी लागत असलेले दही, दुध महागल्याची टीका खडसे यांनी केली. उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी आवाहन केले की, गणेशोत्सव आनंदात आणि उत्साहात साजरा करा. मात्र अलिकडच्या स्थितीत उत्साह आणि आनंदावर महागाईचे विर्जन पडले आहे. दरवर्षीप्रमाणे जो आनंद आणि उत्साह असतो त्या उत्साहावर महागाईने विर्जन घातल्याची टीका खडसे यांनी केली.

खडसे यांच्या टीकेला केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांनी प्रत्युत्तर दिले आहे. महागाई आहेच. मात्र ही महागाई संपूर्ण जगात आहे. अमेरिका आणि चीनशी तुलनेत भारतात महागाई कमी आहे. भारताची अर्थव्यवस्था वाढत असल्याचेही कराड यांनी नमूद केले.



औरंगाबाद : यंदा दोन वर्षांची कसर भाविकांनी भरुन काढली आहे. शहरातील काही मंडळांनी तर एक दिवसापूर्वीच मुर्तीकाराकडून गणेश मुर्ती मंडळात आणली. तर काहींनी आज सकाळपासून बाप्पाची मिरवणूक काढून जल्लोषात स्वागत करत स्थापना केली.

# गणपती बाप्पा मोरया...!

## तिमाहीत भारताची अर्थव्यवस्था १३.५ टक्क्यांनी वाढली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मंदी आणि चलनवाढीच्या प्रभावाने जगभरातील अर्थव्यवस्था त्रस्त असतानाही सर्व आव्हानांना न जुमानता भारतीय अर्थव्यवस्था वेगाने प्रगती करत आहे. बुधवारी जाहीर झालेल्या पहिल्या तिमाहीतील जीडीपीची अधिकृत आकडेवारी हे स्पष्टपणे दर्शवते. ताज्या आकडेवारीनुसार जून २०२२ च्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्था १३.५ टक्क्यांच्या प्रभावी दराने वाढली. सर्व अंदाज भारताकडूनही अशाच आकड्याची अपेक्षा करत होते.**

मोठ्या अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था अमेरिकेबद्दल बोलायचे तर ती औपचारिकपणे मंदीच्या गर्तेत सापडली आहे. जून तिमाहीत अमेरिकेचा जीडीपी ०.६ टक्क्यांनी घसरला. यापूर्वी मार्च तिमाहीत देशाच्या अर्थव्यवस्थेचा अंदाज १.६ टक्क्यांनी कमी झाला होता. जर एखाद्या अर्थव्यवस्थेला सलग दोन तिमाहीत घसरण होत असेल तर ती अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत आहे असे म्हटले जाते. याशिवाय ब्रिटनची अर्थव्यवस्थाही मंदीच्या गर्तेत आहे. जानेवारीच्या तिमाहीत इंग्लंड अर्थव्यवस्थेत ०.८ टक्के घसरण झाली. सर्व मॅक्रो इकॉनॉमिक इंडिकेटर जूनच्या तिमाहीतही जीडीपीमध्ये घसरण दर्शवत आहेत.

**जुलैमध्ये कोअर सेक्टरमध्ये मंदी**

यापूर्वी आर्थिक वर्ष २०२१-२ (Q4FY22) च्या चौथ्या तिमाहीत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) ४.१ टक्के दराने वाढले होते. तर संपूर्ण आर्थिक वर्षाबद्दल बोलायचे तर २०२१-२ मध्ये जीडीपीचा विकास दर ८.७ टक्के होता. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या (एनएसओ) आकडेवारीनुसार जून २०२२ च्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्था १३.५ टक्क्यांनी वाढली आहे. एनएसओने असेही सांगितले की जुलै महिन्यात कोअर सेक्टरचे उत्पादन मंदावले आहे. कोर क्षेत्राचा विकास दर एका वर्षापूर्वी ९.९ टक्के होता, जो जुलै २०२२ मध्ये ४.५ टक्क्यांवर आला.

**एका वर्षातील सर्वात वेगवान वाढ**

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने या आर्थिक वर्षाच्या (FY23) पहिल्या तिमाहीसाठी ५:३० वाजता जीडीपी डेटा जाहीर केला. आकडेवारीनुसार जूनच्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्था गेल्या एका वर्षातील सर्वात वेगाने वाढली आहे. यापूर्वी जून २०२१ च्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेने २०.१ टक्के दराने वाढीचा विक्रम रचला होता. तसेच गेल्या वर्षीच्या कमकुवत पायामुळे आणि साथीच्या रोगाचा प्रभाव कमी झाल्यानंतर उपभोगातील पुनर्प्राप्तीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मदत झाली आहे. याशिवाय महागाई नियंत्रणात आल्यानेही दिलासा मिळाला आहे. पण भारतीय अर्थव्यवस्थेसमोर अजूनही काही आव्हाने आहेत, ज्याचा परिणाम येत्या तिमाहीच्या आकडेवारीवर दिसून येईल.


### ४ महिन्यांत किती वित्तीय तूट

सरकारी आकडेवारीनुसार या आर्थिक वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत म्हणजेच एप्रिल-जुलै २०२२ मध्ये वित्तीय तूट ३.४१ लाख कोटी रुपये होती. हे संपूर्ण वर्षाच्या अंदाजाच्या २०.५ टक्के इतके आहे. या चार महिन्यांत सरकारला ७.८६ लाख कोटी रुपये मिळाले, तर एकूण खर्च ११.२७ लाख कोटी रुपये झाला. पहिल्या चार महिन्यांच्या पावत्या पूर्ण वर्षाच्या अंदाजाच्या ३४.४ टक्के आहेत. यामध्ये सरकारला महसूल आघाडीवर ७.५६ लाख कोटी रुपये मिळाले. कर महसुलात ६.६६ लाख कोटी रुपयांचा वाटा आहे.

## पंतप्रधान मोदी त्यांच्या जेवणाचा खर्च स्वतःच उचलतात

### आरटीआयमधून खुलासा

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून त्यांच्याबद्दल अनेक गोष्टी जाणून घेण्याची सर्वांनाच उत्सुकता आहे. मोदी काय खातात, त्यांचे राहणीमान कसे आहे, त्यांचे सोशल मीडिया अकाऊंट कोण सांभाळते? असे अनेक प्रश्न सर्वसामान्यांना पडतात. पंतप्रधान मोदींबद्दल काही प्रश्न माहिती अधिकार अर्जातून विचारण्यात आले होते. त्या अर्जाला माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले आहे. आरटीआयमध्ये पंतप्रधान मोदींच्या जेवणावर होणाऱ्या खर्चाबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाला अधिकाऱ्यांनी उत्तर दिले आहे. मोदी त्यांच्या जेवणाचा खर्च स्वतःच उचलतात. त्यांच्या जेवणावर सरकार कोणताही खर्च करत नाही, असे उत्तर आरटीआयमधून मिळाले. मोदींना गुजराती जेवण आवडते. त्यांना आचारी बद्री मीणा यांनी केलेला स्वयंपाक आवडतो. बाजरीची रोटी आणि खिचडी मोदींना सर्वाधिक आवडते. मोदींनी घेतलेल्या सुट्ट्यांची माहिती मागण्यात आली होती. त्यावर मोदींनी आतापर्यंत एकही सुट्टी घेतली नसल्याची माहिती पीएमओने दिली. मोदी किती तास काम करतात, असा प्रश्न एका आरटीआयमधून विचारण्यात आला. त्यावर मोदी प्रत्येक वेळी ड्युटीवरच असतात, असे उत्तर दिले. पीएमओमधील इंटरनेटचा स्पीड किती असा प्रश्न 2015 मध्ये एका आरटीआयमधून विचारला गेला. त्याला 34 एमबीपीएस असे उत्तर देण्यात आले. एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे.

# शेतकऱ्याने साकारली कांद्यापासून गणेश मूर्ती

आधुनिक केसरी न्यूज

शिरवाडे वाकद : नैताळे येथील कांदा उत्पादक शेतकरी संजय साठे यांनी कांद्यापासून तयार केलेली गणेश मूर्ती स्थापित केली आहे. यातून त्यांनी शेतकरी समस्यांबाबत राज्यकर्त्यांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला आहे. साठे यांनी गणरायांच्या चरणी नतमस्तक होत राज्यकर्त्यांना सद्बुद्धी द्यावी व शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष देण्याचे साकडे गणरायाला घातले.


आज मोठ्या उत्साहात महाराष्ट्रातील प्रत्येक घरात गणरायाचं आगमन होत आहे. या मंगलमय प्रसंगी प्रत्येक जण सुख: दुःख विसरून आपल्या घरात गणरायाची स्थापना करत असतो. आज महाराष्ट्रात शेतकऱ्यांना अनेक समस्यांनी ग्रासले आहे. अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सध्या कांदा पिकाला कवडीमोल भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघेनासा झाला आहे. शेती व्यवसाय आतबट्ट्याचा ठरत आहे. कोरोना काळात द्राक्षे कवडीमोल भावात विकले गेल्याने द्राक्षे उत्पादक कर्जबाजारी झाले आहेत. सरकारने दोन लाखापर्यंत कर्जमाफी केली मात्र दोन लाखावरील कर्जमाफी प्रलंबित आहे. जिल्हा बँकेने कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांना नोटिसा पाठवल्या आहेत. त्यातच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळाली नाही.

टोमॅटोला अवघा १० रुपये किलो भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे मुलामुलींचे लग्न, आजारपण यावर खर्च करणे मुश्कील झाले आहे. यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. शेतकऱ्यांच्या या समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी कांद्यापासून तयार केलेल्या गणरायाच्या मूर्तीची स्थापना केल्याचे संजय साठे यांनी सांगितले.

यापूर्वी संजय साठे यांनी थेट बराक ओबामा यांची मुंबईत भेट घेऊन व्यथा मांडली होती. त्यानंतर थेट पंतप्रधानांना कांदा विकून मिळालेल्या अल्प रकमेची मनीऑर्डर व नंतर टोपी उपरणे पाठवून थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लक्ष वेधले होते.

> **मी गणरायांच्या चरणी प्रार्थना करतो की, राज्यकर्त्यांना सद्बुद्धी देऊन शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष द्यावे. वाढत्या शेतकरी आत्महत्या बंद होण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे. द्राक्षे, टोमॅटो, कांदा पिकासाठी कायमस्वरूपी आयात निर्यात धोरण ठरवावे.**
>
> **संजय साठे**






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## जहाँ डाल डाल पर...

आधुनिक केसरी

त्याबाबत आपण त्यांचे ऋणी आहोत. प्राचीन भारताने जगाला दिलेली तिसरी देणगी म्हणजे ' अध्यात्म '. आजच्या मूल्ये हरवत चाललेल्या जगात, धावपळ आणि ताणतणाव असलेल्या जगात सगळ्यांना तारू शकेल, मार्गदर्शन करू शकेल अशी गोष्ट जर कोणती असेल तर ती म्हणजे भारतीय तत्वज्ञान आणि अध्यात्म. भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, रामायण, महाभारत आदी ग्रंथ आजही जगाला प्रेरणा देणारे मोठे स्रोत आहेत.
आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी मागे एकदा लंडनमध्ये बसवलेल्या भगवान बसवेश्वरांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी गेले होते. त्यावेळी बोलताना ते म्हणाले की , ' एका बाजूला मॅग्ना कार्टा आणि दुसऱ्या बाजूला महात्मा बसवेश्वरांची वचने ठेवा. तुम्हाला समजेल की मॅग्ना कार्टाच्या कितीतरी शतकांपूर्वी माझ्या देशाचा समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन काय होता ! ' ' कृण्वन्तो विश्वमार्यम ' हा आपल्या ऋग्वेदातील मंत्र आहे. हा मंत्र सांगतो की जगातील प्रत्येक मानवाला ' आर्य ' म्हणजे एक श्रेष्ठ आणि आदर्श माणूस घडवू या. हा मंत्र जरी छोटा असला तरी त्यातील अर्थ मात्र विशाल आहे. जाती, धर्म, पंथ, मतमतांतरे इ. च्या गलबल्यातून बाहेर काढून जगातील सर्व माणसांना ' आर्य ' म्हणजेच श्रेष्ठ माणूस बनवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. प्राचीन ग्रंथात ' आर्य ईश्वरपुत्र : ' असे म्हटले आहे. यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की प्राचीन भारतीयांना ' आर्य 'म्हणण्याची पद्धत होती. आपल्या देशालाही ' आर्यावर्त ' असे म्हटले जाई. या अर्थाने आपण सगळे आर्यच आहोत. रामायण, महाभारतात त्यातील पराक्रमी वीरांचा उल्लेख करताना किंवा त्यांना संबोधताना त्यांच्या पत्नी त्यांना ' आर्यपुत्र ' असे म्हटल्याचे आपल्याला आढळते.
मग ' आर्य ' कोण ? ' आर्य ' म्हणजे कोणा एका विशिष्ट धर्म, जाती पंथाची व्यक्ती नसून जो पवित्र आणि शुद्ध कर्तव्यकर्माचे आचरण करतो, वाईट गोष्टींपासून दूर राहतो आणि पूर्णांशाने सदाचारी असतो तोच ' आर्य ' होय. पुढील काळात आपल्यातून अशाच सज्जनांची मांदियाळी निर्माण व्हावी आणि आपल्या प्राचीन भारताची वैभवशाली परंपरा आपण पुढे चालवावी, त्याला गतवैभव प्राप्त करून द्यावे असे या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने म्हणावेसे वाटते. पुन्हा आपण अभिमानाने म्हणू शकू, ' जहाँ डाल डाल पर सोने की चिडिया करती हैं बसेरा, वो भारत देश हैं मेरा. '



## आनंदी पहाट

## निराशेमुळे येणारा दीर्घकालीन तणाव घातक

आधुनिक केसरी

चिंता विविध गोष्टींमुळे होऊ शकते जसे कि, तणाव, अनुवांशिकता, मेंदूचे रसायनशास्त्र, क्लेशकारक घटना किंवा पर्यावरणीय घटक ही होत. चिंताविरोधी औषधाने लक्षणे कमी करता येतात, परंतु औषधोपचार करूनही, काही जणांना अजूनही काही चिंता किंवा पॅनीक अटॅकचा अनुभव येऊ शकतो. चिंताग्रस्त विकारांमुळे जलद हृदय गती, धडधडणे आणि छातीत दुखणे अशा प्रकारच्या विपरीत परिणामांना सामोरे जावे लागते, काहीजणांना उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका देखील असू शकतो. अगोदरच हृदयविकार असल्यास, चिंताग्रस्त विकारांमुळे कोरोनरी इव्हेंट्सचा धोका वाढू शकतो. निदान न झालेल्या किंवा उपचार न केलेल्या चिंता विकार असलेल्या बहुसंख्य लोकांसाठी, व्यक्ती आणि समाज या दोघांसाठी अनेक नकारात्मक परिणाम निर्माण करणारे ठरू शकतात. यामध्ये अपंगत्व, काम करण्याची क्षमता कमी झाल्याने उत्पादकता कमी होणे आणि आत्महत्येचा उच्च धोका निर्माण होणे, यांचा समावेश असतो.
नकारात्मक दृष्टीकोन आणि असहायता तसेच निराशेच्या भावना दीर्घकालीन तणाव निर्माण करू शकतात, ज्यामुळे शरीरातील संप्रेरक संतुलन बिघडते. आनंदासाठी आवश्यक असणारी मेंदूतील रसायने कमी होतात आणि रोगप्रतिकारक शक्ती बिघडत जाते, दीर्घकालीन तणावामुळे आपले आयुर्मान देखील कमी होऊ शकते. जेव्हा आपण विचार करतो की काहीतरी वाईट होईल तेव्हा हमखास काहीतरी वाईटच घडते. म्हणजेच आपण जसा विचार करतो तसेच घडते. ह्यासाठी नेहमी सकारात्मक विचार करावा म्हणजे अनुभव देखील सकारात्मकच येत राहतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### तुम्हावीन सांगा | कोण वाली ||

आरूषाची बोली | कौतुक मातेसी ||
त्याचे आणिकासी | काय घेणे ||१||

तैसे माझे बोल | जाण तू विठ्ठला ||
नको बोलबाला | क्लेशदायी ||२||

मानपान सारा | व्यवहार लटका ||
भक्तीत नेटका | लीन भाव ||३||

देखता चरण | आता सुखावलो ||
बालक मी झालो | अजाणता ||४||

माय बाप गोत | तुम्ही पांडुरंगा ||
तुम्हावीन सांगा | कोण वाली ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

**गीर्देवतेतिगरुडध्वजसुन्दरीति
शाकम्भरीतिशशिशेखरवल्लभेति ।
सृष्टिस्थितिप्रलयकेलिषु संस्थितायै
तस्यै नमस्त्रिभुवनैकगुरोस्तरुण्यै ॥१०॥**

जी सृजनाच्या वेळी ब्रह्मशक्तीच्या रूपात स्थित होते, पालनाच्या वेळी वैष्णवी शक्तीच्या रूपात विराजमान होते, प्रलयलीलेच्या वेळी रुद्रशक्तीच्या रूपात स्थित होते, त्या त्रिभुवनाचे एकमात्र गुरु भगवान नारायणाच्या नित्ययौवना प्रिया श्रीलक्ष्मीला नमस्कार असो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## अध्यात्मात अहंकाराला स्थान नाही

आधुनिक केसरी

अहंकाराचा वारा न लागो म्हणतात ते सार्थ आहे. मी पारायण केले, मी नामस्मरण केले ह्यामध्ये असलेला (मी) फार चालत असतो आणि तो आपल्यात आणि सद्गुरुंमध्ये दरी निर्माण करतो. त्यापेक्षा महाराजांनी मला नामस्मरणाची संधी दिली आणि मी कृतकृत्य झालो. महाराजांनी माझ्याकडून पारायण करून घेतले हा असा भाव आपण मनात ठेवला तर अहंकार मनास शिवणारसुध्दा नाही. आहो आपण कोण पारायण आणि नामस्मरण करणारे मुळातच आपल्या आयुष्यात सद्गुरुंचे आगमन व्हायला आपले पुर्व प्रारब्ध लागते हे विसरून चालणार नाही. आध्यात्मिक प्रवास हा अत्यंत खडतर आहे. इथे पी हळद हो गौरी हा नियम लागू पडत नाही. इथे लागतो तो संयम गोष्टी आपोआप घडत जातात आपण आपल्या साधनेत तसूभरही चुकायचे नाही आणि काही मागायचे नाही. आपल्याला काय द्यायचे हे गुरुंना माहीत असते आणि वेळ आली कि ते आपल्याला दिल्या शिवाय रहात नाही. अध्यात्मातील मार्ग खूप खडतर आहेच पण महाराज खूप परीक्षा पाहतात. अगदी टफ पेपर असतो त्यांचा पण एक दिवस नक्कीच पास होतो. काहींचा संयम सुटतो आणि मग त्यांनी आपली परीक्षा घ्यायची तर आपणच त्यांची परीक्षा घेतो. महाराज आपले पोरखेळ पाहत राहतात. आपण उठसूट महाराजांना वेठीस धरतो... चार दिवस नाही झाले, २ माळा नाही ओढल्या तर किती गर्व होतो आपल्याला, आपल्यासारखा कुणी भक्तच नाही ह्या भावनेने दिमाखात वावरू लागतो. महाराजांवर हक्क ही गाजवू लागतो. पण महाराज आपल्यावर कधी रागवत नाहीत कारण ह्या सर्वातून सुखावूनच आपण एक उत्तम भक्त होणार असतो. त्यांच्या सर्व कसोट्यांवर खरे उतरलो कि महाराजांचे दर्शनही घडते आपल्याला महाराजांनी आपल्या भक्तांना अभिवचन दिले आहे जिथे स्वामीनाम आहे तिथे मी आहे. पण वर्षानुवर्ष आध्यात्मिक प्रवास करूनही एक प्रश्न स्वतःला विचारला "आध्यात्मातील कुठल्या पायरीवर आहे मी? तर त्याचे उत्तर आहे. अजूनही पहिल्याच पायरीवर आहे मी...

**– श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# मंगलमयतेची अनुभूती देणारी श्री सत्यनारायण महापूजा



आधुनिक केसरी न्यूज

ही आरती येईल तशी म्हणत. सर्वजण फुले वाहत. पंचामृत व प्रसाद आणला जाइ. पोथी वाचनारा किंवा आमच्यापैकी कुणीतरी प्रसाद द्यायला बसत. प्रत्येकजण येऊन सत्यनारायणाच्या पाया पडून आरतीच्या ताटात पाच, दहा, वीस पैसे, चार आणे दक्षिणा ओवाळून टाके. त्यांच्या उजव्या हातात आधी थोडा शिरा व त्यावर लहान चमच्याने दूध, दही, केळी वगैरे घालून तयार केलेले पंचामृत दिले की ते भक्तिभावे खाऊन हात डोक्यावर पुसत. क्वचितच कुणीतरी आठ आणे ओवाळणी टाके. सर्व वजनदार नाण्यांनी ताट वजनदार होइ. वीस पैशांचे सोनेरी नाणे उठून दिसे. जमलेल्या दक्षिणेवर पोथी वाचणाराचा हक्क असे.... (काही वेळा मीही वाचायचो. मला ती वजनदार नाण्यांची दक्षिणा मिळायची. ती मी दिवाळीत टिकल्या, एखादी लवंगी फटाक्यांची माळ घ्यायला एका कापडी बटव्यात घालून जपून ठेवायचो.)
मग पंगत होइ. पंगतीत जेवणापूर्वी - माझे आजोबा पुढील श्लोक सुरात म्हणत
अरे रावणा राज्य गंभीर केले..
सीते सारखे रत्न चोरून नेले...
सीते सारखे रत्न तुला पचेना...
चौदा चौखड्यांचे राज्य तुला घडेना....ll
बोला, पुंडलिक वर दे, हरी विठ्ठल.....
श्री ज्ञानदेव तुकाराम......
पंढरीनाथ महाराज की जय.....ll
(वरील श्लोक कवी ज्ञानेश डोंगरे यांच्या सौजन्याने)
तसेच
'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे
सहज हवन होते नाम घेता फुकाचे
जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म
उदरभरण नोहे जाणीजे यज्ञकर्म ||'
यासारखे श्लोकही अधूनमधून म्हणत
पंगत सुरू होइ. बऱ्याच लोकांचा सोमवार चा उपवास असे. सर्वजण उपवास सोडत. आग्रह करत सर्व पदार्थ पानात वाढले जात. येतील तसे लोक अगोदर सत्यनारायणाला नमस्कार करुन कपाळावर इभतीचे पट्टे, बुक्का लावून प्रसाद घेऊन भक्षण करीत. नंतर गोड, मधूर खिरीचा मनसोक्त आस्वाद घेऊन घरी परतत.
त्या रात्री मांडलेली पूजा तशीच ठेवली जाइ. दुसऱ्या दिवशी उत्तरपूजा केली जाइ. शक्यतो तांदळ, कुंदर, शेपू वगैरेपैकी एखाददुसरी रानभाजी, गरम भाकरीचा नैवेद्य दाखवून पुन्हा आरती करुन, प्रसाद वाटून पूजा सोडून खुटं, फुलं, कच्ची फळे एकत्र करुन ते सर्व निर्माल्य विहिरीत विसर्जित केले जाइ. पुजेतले खारीक, खोबरे, फळे वगैरे खाल्ले जाइ. एक रुपया दक्षिणा घालून पोथी परत नेऊन दिली जाइ. सर्वांची मने, सारं घरदार पवित्र, निर्मळ आनंदाने भरून गेल्याचा अनुभव येइ. अजूनही अधूनमधून आम्ही सत्यनारायणाची पूजा करतो. भिवा काकाचा मुलगा अर्थात आमचा मावसभाऊ तानाजी केळीचं खुटं, पाने, फुले वगैरे आत्मियतेने घेऊन येतो. पण त्यावेळेसारखे सारेच जमत नाही. खिरीऐवजी आता शिरा, भात, भाजी करण्याकडे लोकांचा कल वाढतो आहे. गावाच्या दक्षिणेकडे पूर्ण दगडी छोटे शिखर, पडवीचे बांधकाम असलेल्या पुरातन महादेव मंदिरात मात्र अजूनही दर वर्षी श्रावणातल्या शेवटच्या सोमवारी खीर केली जाते. अगदी पूर्वीपासून तिथे त्या दिवशी छोटीशी जत्रा भरते. लोक भक्तिभावाने जाऊन खिरीचा प्रसाद घेतात. दर सोमवारी भाविक नित्य नेमाने तेथे जाऊन दर्शन घेऊन, तेथील झाडावरील बेल पाने, फळे प्रसाद म्हणून आणतात.

महादेव बी. बुरुटे
मो. 9765374805

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या विभागीय कार्यालयात श्रींची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली.
समाजातील सर्वस्तरातील मान्यवर लोकांना या माध्यमातून एकत्र आणून समाजोपयोगी विविध उपक्रम या माध्यमातून राबविण्याची सूचना वसंत मुंडे यांनी केली आहे. त्यामुळे रक्तदान शिबीर, गरजुंना अन्नधान्य व उबदार कपड्यांचे वाटप यंदाच्या श्री गणेश उत्सवात करण्यात येणार आहे.
राज्य पत्रकार संघाच्या गारखेडा परिसरातील विभागीय कार्यालयात आज प्रचंड उत्साहात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, संघटक विलास शिंगी, जिल्हा उपाध्यक्ष छबुराव ताके, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, ज्ञानेश्वर तांबे पाटील, अनिल कुलथे, वेदांत गोरे आदींसह पत्रकारांची उपस्थिती होती.

### आजच्या आरतीचे मान्यवर



**श्री गणेशाची गुरुवार दि.1 रोजीची सायंकाळची आरती प्रख्यात डॉक्टर उज्ज्वला दहिफळे, मराठवाडा संयोजिका, भटक्या विमुक्त महिला आघाडी, समन्वयक, भाजपा प्रदेश राष्ट्रीय स्वास्थ स्वयंसेवक अभियान, सचिव, इंडियन मेडिकल असोसिएशन औरंगाबाद ब्रांच यांच्या हस्ते होणार आहे, तरी पत्रकार बांधवांनी या आरतीच्या पावनप्रसंगी उपस्थित राहावे, अशी विनंती संघाच्या वतीने करण्यात आली आहे.**


# माजी खासदाराने शिंदे गटात प्रवेश करताच ओमराजे संतापले

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** जिल्ह्यातील शिवसेनेचे माजी खासदार रविंद्र गायकवाड यांनी नुकताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या बंडखोर गटात प्रवेश केला. गायकवाड यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची साथ सोडल्यानंतर उस्मानाबादचे विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांनी जोरदार टीका करत आक्रमक इशारा दिला आहे.
आमदार आणि खासदार हे शिवसैनिकांमुळे होत असतात. मात्र स्वार्थ दिसला की हेच लोकप्रतिनिधी दुसरीकडे उडी मारतात. या प्रकरणामुळे सच्चा शिवसैनिक दुखावला गेला आहे. मतदारसंघातील नागरिक बोलत नाहीत, पण निवडणुकीत मताच्या माध्यमातून ते आपला रोष व्यक्त करतील,' अशी प्रतिक्रिया खासदार ओमराजे निंबाळकर यांनी दिली आहे. २०१९ मध्ये अशीच परिस्थिती निर्माण केली होती. पण शिवसैनिकांनी शिवसेनेशी प्रतारणा केली नाही. मला उमरगा लोहारा मतदारसंघाने २२ हजार मतांची आघाडी दिली.

# अखेर भोकर शहरातील पथदिवे झाले सुरू

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** मागील अनेक दिवसांपासून शहरातील बंद असल्याने नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागला. सध्या सणासुदीचे दिवस असूनही पालिकेनी याकडे लक्ष दिले नाही. बातम्याचा भडीमार सुरु होताच त्याची दखल घेऊन पालीकेनी पथदिव्याखाली असलेला अंधार दूर केल्याने आता शहरातील मुख्य रस्ते प्रकाशयम झाले आहेत.
नगरपालिका अस्तित्वात आल्याने शहरातील विजेचा प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले आणि शहर प्रकाशमय झाले. पथदिवे, हॉयपावर विजेचे मर्क्युरी बसविण्यात आली. या कामात हलगर्जीपणा करुन गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी झाल्या संबंधितांनी यावर काहीच कार्यवाही केली नाही. सदरील विजपुरवठा सुरळीत करण्यासाठी पालिकेनी एका कंत्राटदारांकडे ही जबाबदारी सोपवली होती. दरम्यान शहरात वीजपुरवठा सूरळीत होता. अचानक त्या कंत्राटदारास कामबंद करायला सांगितले आणि स्वतः पालिकेनी याची जबाबदारी घेतली. तेव्हापासून शहरातील विजेच्या समस्या निर्माण झाल्या. शहरातील मुख्य रस्त्यावर दुभाजकात पथदिवे आणि चौकात हायपावर मर्क्युरी बसविण्यात आले आहेत.
मागील बऱ्याच दिवसांपासून सदरील पथदिवे बंद झाली होती. रस्त्यावर अंधार झाल्याने नागरीक व वाहतुकीची समस्या निर्माण झाली. अण्णाभाऊ साठे जयंती, पोळा आणि गणेशोत्सव असे सण असल्याने अशा दरम्यान शहरात अंधार असल्याने नागरीकात तीव्र संताप व्यक्त केला जात होता. वृत्तपत्रातून बातम्या प्रसिद्ध होताच याची दखल घेऊन पालिकेनी मागील दोन दिवसांपासून बंद झालेले पथदिवे सुरू केल्याने आता शहरातील रस्ते प्रकाशमान झाल्याचे दिसून येत आहे. येणाऱ्या काळात ही असाच विजपुरवठा सुरळीत राहिले याची काळजी घेणे गरजेचे आहे, अशी नागरीकाची मागणी आहे.



# स्वा. सावरकर पतसंस्थेची सर्वसाधारण सभा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** स्वा. सावरकर पतसंस्थेची २४ वी सर्वसाधारण सभा संपन्न झाली. या सभेसाठी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी पतसंस्थेच्या कमी कालावधीत झालेल्या यशस्वी वाटचालीचे भरभरून कौतुक केले. तसेच संचालक मंडळाचे अभिनंदन केले. पतसंस्थेच्या माध्यमातून अजून कशाप्रकारे शिक्षकांना आर्थिक मदत होईल व त्यांच्या अडचणी कशा दूर होतील यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन केले.
संस्थेचे प्रशासकीय अधिकारी तथा माजी सहकार्यवाह चंद्रकांत मुळे यांनी आपल्या मनोगतात पतसंस्थेच्या उभारणीमुळे शिक्षकांना खुप मदत होते आहे. संस्थेतील छोट्या संस्कार केंद्रातील शिक्षकांनाही याचा फायदा होण्यासाठी संस्था पातळीवर एकच मोठी पतसंस्था उभी करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.
पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात पतसंस्थेचा आर्थिक लेखाजोखा सादर केला. पतसंस्थेच्या योग्य वाटचालीमुळे सावरकर पतसंस्थेला अ दर्जा प्राप्त झाल्याची माहिती दिली. तसेच आगामी काळात पतसंस्थेच्या माध्यमातून अधिकाधिक कर्मचाऱ्यांना फायदा होण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन दिले.
यावेळी पतसंस्थेचे सचिव नंदकिशोर झरीकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पतसंस्थेच्या उत्तम कामकाजामुळे भागधारक सभासदांना चांगला फायदा होत आहे. यावेळी त्यांनी सभासदांना 13 टक्के लाभांश मिळणार आहे, असे घोषित केले. तसेच नवीन सचिवपदी प्रा. शशिकांत पसारकर यांची एकमताने निवड करण्यात आली, असे घोषित केले. यावेळी पतसंस्थेच्या आर्थिक अहवालाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पतसंस्थेच्या सभासदांच्या ज्या पाल्यांनी दहावी बारावी परीक्षेत यश संपादन केले त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्था कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी तथा माजी सहकार्यवाह चंद्रकांत मुळे, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष गजाननराव जगताप, शालेय समिती अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, पतसंस्थेचे सचिव नंदकिशोर झरीकर, मुख्याध्यापक द्वय संजय विभूते तथा प्रदीप जोशी हे उपस्थित होते.

# पैठणमध्ये गणरायाचे जल्लोषात स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** गेल्या दोन वर्षांपासून बाप्पाच्या भेटीची आस लागलेल्या गणेश भक्तांची आज काळजी मिटली. दरवर्षी आकर्षक व आगळ्या वेगळ्या अश्या श्री ची मूर्ती स्थापन करण्याचा नावलौकिक असणाऱ्या पैठण शहरतील दुर्गावाडी गल्ली येथील वरद गणेश मंडळाने दोन वर्षाच्या कोरोनाच्या सावटानंतर मोठ्या उस्तहात आकर्षक अश्या दगडूशेठ गणपती मूर्ती ची स्थापना केली.
पैठण शहरात विघ्नहर्त्या गणरायाचं जल्लोषात स्वागत करून ढोलाच्या कडकडाट, गुलाल आणि फुलांची उधळण करत बाप्पाच आगमन झाले. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वरद गणेश मंडळाने खास अहमदनगर येथिल कारखान्यात तयार करण्यात आलेली दगडूशेठ गणपतीची मूर्ती आणून स्थापना केली आहे. गणपत्ती बाप्पा मोरया, आले रे आले गणपती आले अशा घोषणाही यावेळी दिल्या जात होत्या. त्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साह आणि चैतन्य निर्माण झाले होते. यावेळी वरद गणेश मंडळाचे पदाधिकारी पवन लोहिया, महेश मडके, पंकज लोहिया, ज्ञानेश्वर दहिवाळ, मनिष तोतला, मयूर लोहिया, योगेश राठी, मयूर मालपाणी, महेश बजाज, वैभव पोहेकर, शुभम जगताप, अनिकेत मुंडलिक, भूषण हरकारे, स्वयंम लोहिया आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शेतकऱ्याने शेतीच्या वादातून घेतला गळफास

आधुनिक केसरी न्यूज

**कचनेर :** पैठण तालुक्यातील गेवराई बाशी येथील एका 70 वर्षीय शेतकऱ्याने शेतीच्या वादातून गळफास घेतला. ही घटना बुधवारी दिनांक 31 रोजी सकाळी घडली. आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये एमआयडीसी पोलीस आणि तहसील कर्मचाऱ्यांच्या त्रासामुळे आत्महत्या करत असल्याचे नमूद केले आहे.
अधिक माहिती अशी की तालुक्यातील गेवराई बार्शी येथील शेतकरी शेषराव सोमाजी खुटेकर यांच्या भावकीमध्ये शेती संदर्भात वाद सुरू होता. वादातून संबंधित तहसील विभाग व एमआयडीसी पोलीस ठाण्याचे जबाबदार अधिकारी योग्य न्याय करत नव्हते. त्रासामुळे बुधवारी रोजी सकाळी या शेतकऱ्याने आपल्या राहत्या घराच्या छताला गळफास घेऊन जीवन यात्रा संपवली. या प्रकारची माहिती मिळताच पैठण विभागीय अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान आत्महत्या करण्यापूर्वी मयत खुटेकर यांनी चिठ्ठी लिहून ठेवली आहे. त्या चिठ्ठीमध्ये स्थानिक पोलीस व तहसील कर्मचाऱ्यांचा अनेक जणांचे नाव यात नमूद असण्याचे माहिती मयताच्या नातेवाईकांनी दिली. पोलीस पंचनामा व तपासानंतर खरे प्रकरण काय आहे हे समोर येणार आहे.




# धुळ्यात बाप्पाचे जोरदार आगमन

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** गणपती बाप्पा मोरया'चा गगनभेदी जयघोष, ढोल-ताशांचा दणदणाट, गुलालाची उधळण आणि फटाक्यांच्या आतषबाजीत आज गणरायाचे आगमन झाले. मंगळवार सायंकाळपासूनच बाप्पाच्या आगमनाने संपूर्ण धुळे शहर फुलून गेले होते. भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम धुळ्यात दिसून येत होता. लहान-थोरांनी मोठ्या भक्तीभावानं बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना केली.
बाप्पाच्या आगमनासाठी अवघ्या शहरात गेल्या आठ दिवसांपासूनच जय्यत तयारी सुरू होती. आजच्या दिवसाची वाट पाहणाऱ्या सर्वच गणेशभक्तांनी अगदी पारंपारिक वेषात बाप्पाचे स्वागत केले. संतोषी माता चौकात मुख्य रस्ते भाविकांच्या गर्दीने फुलले होते. त्यामुळे तिथली वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली होती. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी मोठ्या प्रमाणात शहरासह जिल्ह्यात चोख पोलिस बंदोबस्त पोलिस अधीक्षक प्रवीण कुमार पाटील व अप्पर पोलिस अधीक्षक प्रशांत बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली लावण्यात आला आहे. सर्वच गणेश मंडळांनी सकाळपासून मिरवणुका काढून वाजतगाजत गणपती आणले. सार्वजनिक मंडळांच्या मंडपांइतकाच उत्साह घराघरांमध्ये पाहायला मिळाला. घराघरांमध्ये प्राणप्रतिष्ठापनेची लगबग सुरू होती. आरती, स्तोत्र आणि मंत्रपठण असे मंगलदायक वातावरण प्रत्येक घरात पाहायला मिळाले. बाप्पा घरी येणार म्हणून बच्चे कंपनी आनंदाने हरखून गेली होती. कुठं बाप्पाची पहिली छबी टिपण्याची तर कुठं बाप्पासोबत सेल्फी काढण्यासाठी झुंबड उडाली होती. बाप्पासोबत काढलेले फोटो सोशल मीडियावर धडकू लागले आहेत.

# तेलंगणात भाजपची व्यूहरचना !

आधुनिक केसरी

तेलंगणात विधानसभा निवडणुकीला अजून वर्षभराचा कालावधी असला तरी काँग्रेस आमदाराने राजीनामा देऊन भाजपमध्ये प्रवेश केल्याने मुनूगोड या मतदारसंघातील पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वीच राज्यातील तसेच मतदारसंघातील वातावरण तापले आहे. गेल्या दोन वर्षांत दोन पोटनिवडणुका जिंकल्याने भाजपच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. तिसरी पोटनिवडणूक जिंकून पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत तेलंगणा राष्ट्र समितीला पराभूत करण्याची भाजपची व्यूहरचना आहे. तेलंगणा जिंकण्याच्या उद्देशानेच भाजपने अलीकडेच राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक हैदराबादमध्ये आयोजित केली होती. भाजप नेत्यांचे दौरे या राज्यात वाढले आहेत. यामुळेच एका मतदारसंघातील पोटनिवडणूक ही पुढील काही काळासाठी राज्याच्या राजकारणासाठी महत्त्वाची असेल. तेलंगणामध्ये विधानसभेच्या निवडणुका नोव्हेंबर २०२३ मध्ये होणार आहेत. निवडणुकीला अद्याप वर्षभराचा कालावधी असला तरी या राज्यातील वातावरण आतापासूनच ढवळून निघाले आहे. भाजपला दक्षिणेकडील कर्नाटक वगळता अन्य राज्यांमध्ये वर्चस्व अजून तरी प्रस्थापित करता आलेले नाही. तेलंगणात भाजपला यशाची खात्री वाटते. यामुळेच भाजपने सध्या सारी ताकद ही तेलंगणात लावली आहे. तेलंगणात लोकसभेच्या १७ जागा आहेत. विधानसभा जिंकून लोकसभा निवडणुकीत चांगले यश संपादन करण्याची भाजपची योजना आहे. भाजपचा तेलंगणात फारसा प्रभाव नव्हता. पण २०१९च्या लोकसभा निवडणुकीत चार जागा जिंकल्यापासून भाजपने या राज्यावर लक्ष केंद्रित केले होते. पोटनिवडणुकीच्या आधीच परस्परांवर आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. मुख्यमंत्र्यांची कन्या कविथा यांचे मद्य सम्राटांबरोबर आर्थिक संबंध असल्याचा आरोप भाजपच्या प्रदेशाध्यक्षांनी केल्याने वातावरण तापले. दुसरीकडे, अमित शहा यांनी चंद्रशेखर राव यांच्यावर घराणेशाहीचा आरोप सुरू केला आहे. मुख्यमंत्र्यांचे पुत्र मंत्री, कन्या आमदार तर भाचा मंत्री यावर भाजपने भर दिला आहे. भाजपच्या वतीने काढण्यात आलेली पदयात्रा तेलंगणा सरकारने रोखली. त्यावरून भाजपने चंद्रशेखर राव यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. एकूणच एका मतदारसंघातील पोटनिवडणुकीमुळे तेलंगणाचे राजकीय वातावरण पार ढवळून निघाले आहे. राजीनामा दिलेला आमदार हा काँग्रेसचा आहे. पण काँग्रेस पक्ष कुठेच चित्रात दिसत नाही.

# साहित्यिकाचे प्रतिष्ठान




प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**स्वतःचे पाच पैसे खर्च न करता लोकांच्या, विद्यार्थ्यांच्या जीवावर गोळा केलेले पैसे आपल्या स्वतःच्या पुस्तक प्रकाशनासाठी वापरायचे, उरलेले पैसे बँकेत टाकायचे आणि त्यावर जे काही व्याज येणार आहे तेवढ्या रकमेचा पुरस्कार देऊन कार्यक्रम करायचा. ही विद्यार्थ्यांची, समाजाची फसवणूक नव्हे काय? दिशाभूल नव्हे काय? विश्वासघातकीपणा नव्हे काय? असे असत्य साहित्यिकांनी करावे का? हे मला पटत नाही. हल्ली साहित्यक अनेक चांगल्या साहित्यिकांचे जीवन कळपं तयार करून उध्वस्त करत आहेत. त्यांच्या हातचे बाहुले जे आहेत त्यांनाच वर उचलत आहेत. नाहीतरी आज-काल समाजात प्रतिष्ठा मिळवण्यासाठी प्रतिष्ठानला पैसे देऊनही पुरस्कार मिळवला जातो.वरिष्ठ साहित्यिकांची मर्जी राखली किंवा पुढं पुढं केलं की पुरस्कार मिळतो. ते बाहुलेही खोट्या प्रतिष्ठेपायी त्यांच्या गळाला लागत आहेत.**

साहित्यिक म्हटले की त्याच्याकडे समाज एका आदराच्या भावनेने पाहत असतो. समाज साहित्यिकांना प्रचंड मोठ्या प्रमाणावर मान सन्मान देत असतो. तो साहित्यिक माझ्या ओळखीचा असावा, आपण त्याच्याबरोबर मैत्री करावी म्हणून अनेक जण प्रयत्न करत असतात. त्याच्याबरोबर कधी फोटो काढून घेण्याचा प्रयत्न करत असतात.
साहित्यिक हा समाजाचा मार्गदर्शक असतो. समाजावर तो आपल्या लेखनीच्या माध्यमातून सुसंस्कार करत असतो. समाजाला तो घडवण्याचा प्रयत्न करत असतो. म्हणून समाज त्याला जीवापाड जपतो, जीव लावत असतो. परंतु साहित्यकानेही या समाजाच्या प्रेमाला आणि विश्वासाला जागायला हवं. आपल्याकडून समाजाची, माणसांची अवहेलना होणार नाही त्यांचा विश्वासघात होणार नाही याची सतत जपणूक करायला हवी. त्यानं सतत जागृत राहायला हवं. सामाजिक मूल्याची, जीवन मूल्याची आणि निती मूल्याचीही सतत जपणूक त्याने करायला हवी. परंतु हल्ली असे अनेक सुप्रसिद्ध, नामवंत, विचारवंत साहित्यिक आहेत की, समाजाला व्याख्यानाच्या माध्यमातून, लेखणीच्या माध्यमातून भावनिक, आर्थिक, आणि वैचारिक ब्लॅकमेल करून समाजाचा नकळतपणे छळ करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. परंतु समाजाला भावनिकतेमुळे तो साहित्यिक आपल्याला धोका देतो आहे, आपले शोषण आणि दिशाभूल करतो आहे हे कळत नाही कारण ते साहित्यिकाच्या, लेखनाच्या आणि त्याच्या बोलण्याच्या मोहात तुडुंब भरून गेलेले असतात. चिंब न्हाऊन निघालेले असतात. तो साहित्यिक आपला वापर करून घेतो आहे हेही समाजाच्या व इतर छोट्या साहित्यिकाच्या लक्षात येत नाही. पद्धतशीरपणे व अगदी काटेकोरपणे समाजाच्याही लक्षात येणार नाही याची काळजी तो नामवंत साहित्यिक घेत असतो अन् समाजाला फसवत असतो. त्याचे भक्तही तसेच अंध असतात. अशाच साहित्यिकांपैकी एका साहित्यिकाने एक प्रतिष्ठान तयार करून समाजामध्ये स्वतःचं एक नाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. नाहीतरी हल्ली असे करण्याची फॅशनच निघाली आहे. जो तो उठतो एखादे प्रतिष्ठान स्थापन करतो. गौरवग्रथ दुसऱ्याच्या पैशावर काढतो. समाजसेवेच्या नावाखाली अनेकांना पैसे मागतो व त्यामार्फत एखादे चर्चासत्र घेण्याचे व पुरस्कार देण्याचे नियोजन करतो. स्वतः साहित्यिक त्यावरच समाजात प्रचंड मिरवून घेत असतो. खरे तर यामध्ये पैसा मात्र जनतेचा वापरतो व स्वतःचे नाव करून स्वतःची... बडवून घेतो. हे सर्रासपणे उघड उघड चालू आहे. अशाच त्या साहित्यिकाने प्रतिष्ठान काढल्याचे नामदेवाने फोन करून सांगितले. नामदेव सांगत होता की, मध्यंतरी त्या साहित्यिकाचे दोन-तीन पुस्तके प्रकाशित झाली. गौरवग्रंथही काढला. त्यावेळी त्या



साहित्यिकाने त्यांच्या जवळच्या अनेक विद्यार्थ्याकडून ग्रंथासाठी दहा-दहा हजार रुपये गोळा करून लाखो रुपये गोळा केले. त्यातही काही विद्यार्थ्यांनी हॉलचे पैसे दिले तर कोणी जेवणाचे पैसे दिले तर काहींनी चहापान केले. साहित्यिक गुरुजींनाही दोन लाखाच्या वर पगार होता पण ते मात्र पोटातील पाणी थोडेही हलू देत नव्हते. 'मुह में राम बगल मे छुरी' असे वागत होते. अनेक विद्यार्थ्याकडून त्यांनी पैसे गोळा केला. आयुष्यात त्यांनी फुकट काटा कधीच काढला नाही आणि फुकट मदत कुणालाच केली नाही. उलट विद्यार्थ्यांना खूप गोड बोलून वेगवेगळ्या पद्धतीने छळले आणि लुटले. तेच साहित्यिक समाजाचे परिवर्तन करायला निघाले आहेत.
मी म्हणालो, अरे जाऊ दे मग त्यात काय झाले ! करू दे की त्यांना,काही ना काही तरी करतात तरी...
यावर नामदेव म्हणाला, त्यांच्या करण्याला आपली कुठे हरकत आहे. त्यांनी ते काम केलेलं चांगलंच आहे पण स्वतःचे पाच पैसे खर्च न करता लोकांच्या, विद्यार्थ्यांच्या जीवावर गोळा केलेले पैसे आपल्या स्वतःच्या पुस्तक प्रकाशनासाठी वापरायचे, उरलेले पैसे बँकेत टाकायचे आणि त्यावर जे काही व्याज येणार आहे तेवढ्या रकमेचा पुरस्कार देऊन कार्यक्रम करायचा. ही विद्यार्थ्यांची, समाजाची फसवणूक नव्हे काय? दिशाभूल नव्हे काय? विश्वासघातकीपणा नव्हे काय? असे असत्य साहित्यिकांनी करावे का? हे मला पटत नाही. नाहीतरी हल्ली साहित्यक अनेक चांगल्या साहित्यिकांचे जीवन कळपं तयार करून उध्वस्त करत आहेत. त्यांच्या हातचे बाहुले जे आहेत त्यांनाच वर उचलत आहेत. नाहीतरी आज-काल समाजात प्रतिष्ठा मिळवण्यासाठी प्रतिष्ठानला पैसे देऊनही पुरस्कार मिळवला जातो.वरिष्ठ साहित्यिकांची मर्जी राखली किंवा पुढं पुढं केलं की पुरस्कार मिळतो. ते बाहुलेही खोट्या प्रतिष्ठेपायी त्यांच्या गळाला लागत आहेत.
मी म्हणालो, ते खरं आहे पण तू काय करणार? आपण काय करू शकतो?
यावर नामदेव म्हणाला की, तुझे म्हणणे ही अगदी रास्त आहे. अशा या समाजद्रोही, दुटप्पी पणाने वागणाऱ्या अशा या लबाड साहित्यिकांचा पर्दाफाश करायलाच हवा. त्याचा पर्दाफाश होत नाही म्हणून ते असे प्रकार वारंवार करत राहतात. अरे यार त्यांनी असाच आपला अर्धा संसार दुसऱ्याच्या आधारावर चालवला. स्वतःला कधीही दुसऱ्याला चहा पाजण्याचीही झळ लागू दिली नाही. ही वस्तुस्थिती आहे. एकदा का त्यांनी घर सोडले तर चहापाणी, राहणे, खाणे-पिणे सर्व दुसऱ्यावरच अवलंबून. यामध्ये त्यांचं अख्ख आयुष्य निघून गेले.

# असंसर्गजन्य आजारांचे आव्हान




मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आपल्या देशात हृदय विकाराने मृत्यू पावणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, ही मोठी चिंताजनक बाब म्हटली पाहिजे. एका आकडेवारीनुसार सध्याच्या घडीला देशात 54 लाख लोक हृदयरोगाने ग्रस्त आहेत. हृदयरुग्णांच्या संख्येत दरवर्षी होणारी वाढ अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. शिवाय हाच आजार अन्य आजारांनाही आता आमंत्रण देत आहे. म्हणजे याच्यामुळे आणखीही काही आजार रुग्णांना चिकटत आहेत. पुणे येथील चेस्ट रिसर्च फौंडेशन आणि नवी दिल्ली येथील इन्स्टीट्यूट ऑफ जिनेमिक्स अँड इंटीग्रेटेड बायोलॉजी यांनी या गोष्टीचा खुलासा केला आहे की, भारतातील निम्म्यापेक्षा अधिक लोक श्वासासंबंधीच्या आणि फुफ्फुसाच्या आजाराने त्रस्त आहेत. या संबंधीच्या आजारामुळे रोज साडे तीन कोटी रुग्ण आजाराच्या निदानासाठी डॉक्टरांकडे जात आहेत. हा निष्कर्ष आठशे पेक्षा अधिक शहरांचा व्यापकस्वरुपात अभ्यास करून काढण्यात आला आहे.**

या अभ्यासातून आणखी एक गोष्ट समोर आली आहे, ती म्हणजे आपल्या देशातील 21 टक्के जनता हृदय रोग आणि उच्च रक्तदाब या दोन आजारांच्या साखळदंडात अडकली आहे. फुफ्फुसांच्या आजारांबरोबरच दमा आणि ब्रांकाइटीससारख्या रुग्णांची संख्या वाढत असल्याचा उल्लेखही या अभ्यासात करण्यात आला आहे. जगातल्या एकूण 7.3 अब्ज लोकसंख्येपैकी जगभरात दरवर्षी होणाऱ्या मृत्यूंपैकी 18 टक्के मृत्यू 1.3 अब्ज लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात होत आहेत. संयुक्त राष्ट्राच्या जागतिक आरोग्य अहवालामध्येही असाच उल्लेख करण्यात आला आहे. असंसर्गजन्य आजारांमुळे (हृदयरोग, मधुमेह आणि कॅन्सर) येणाऱ्या काही वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेवर फार मोठा परिणाम होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या अहवालात सांगण्यात आले आहे की, 2012 ते 2030 या कालावधीत या आजारांच्या उपचारांवर जवळपास 31 लाख कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा अहवाल शहरी लोकसंख्येच्या विकासावर पडलेल्या परिणामावर आधारित आहे. वाढते शहरीकरण, कामाचा व्याप आणि जीवनशैली आदी गोष्टी या घातक आजारांसाठी जबाबदार आहेत. संयुक्त राष्ट्रचा अहवाल सांगतो की, 2014 ते 2050 दरम्यान 40 कोटी जनता शहरांचा हिस्सा असणार आहे. याचा अंदाज बांधल्यास शहरी अनियोजनाचे चित्र पाहिल्यास किती भयंकर असणार आहे. आजचीच अवस्था इतकी बिकट आणि गलिच्छ आहे की आणखी तीस वर्षांपर्यंतचे चित्र किती भयानक असेल. आजही आपण शहरांच्या विकासाकडे नीटसे पाहत नाही. आकड्यांचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, देशात दरवर्षी होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी सहा मृत्यू कॅन्सरने होत आहेत. जागतिक स्तरावर हाच आकडा आठ टक्के आहे. अशाच प्रकारे भारतात सहा कोटींपेक्षा अधिक मधुमेहाचे रुग्ण आहेत. भारतातील बहुतांश लोकसंख्या श्वसनासंबंधीच्या आजाराने आणि फुफ्फुसाच्या आजाराने त्रस्त आहे. यामुळे भारत जगातील सर्वाधिक आजारांचे ओझे वाहून नेणारा देश आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.जर आपण या आजारांवर नियंत्रण आणू शकलो नाही तर आपल्या देशाची ओळख आजारांचा देश म्हणून होत राहील.
जानेवारी 2015 मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने (डब्लूटीओ) ने खुलासा केला होता की, जगात असंसर्गजन्य आजाराने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. जगात दरवर्षी दीड कोटी कॅन्सर, मधुमेह आणि हार्ट अटॅकसारख्या गैरसंक्रमण आजाराने माणसे मरत आहेत.जर अशा आजाराने ग्रस्त लोकांना वेळेत उपचार मिळाल्यास त्यांचा जीव वाचू शकतो. अहवालानुसार भारतात या आजाराने तीस ते सत्तर वयाच्या दरम्यानच्या लोकांची मृत्यूची शक्यता 26.2 टक्के इतकी आहे. तुलना करायची झाल्यास हा आकडा दक्षिण आशिया आणि आफ्रिकातील काही देशांच्या तुलनेत खूपच खराब आहे. डब्लूटीओनुसार पी-5 देशांमधील (रशिया, चीन, फ्रान्स, ब्रिटेन आणि अमेरिका) फक्त रशियाची स्थिती (29.2 टक्के) भारतापेक्षा वाईट आहे. 2012 मध्ये भारतात 52.2 टक्के लोकांचा मृत्यू या असंसर्गजन्य आजाराने झाले होते. जागतिक आरोग्य संघटनेने मान्य केले आहे की, असंसर्गजन्य आजारांमध्ये कॅन्सर,मधुमेह, हृदयरोग आणि श्वसनासंबंधीचे प्रमुख चार आजार आहेत.



काही वर्षांपूर्वी जागतिक आरोग्य संघटना आणि आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक समितीद्वारा लोकांच्या जीवनशैलीमध्ये सुधारणा आणण्याच्या दृष्टीकोनातून व्यापक स्वरुपात काही गोष्टींवर सहमती झाली होती आणि असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रणही येईल, अशी आशाही करण्यात आली होती. मात्र दुर्दैव असे की, अजूनही या दिशेने पावले उचलली गेली नाहीत. 2023 पर्यंत जर या आजारांवर नियंत्रण आणले गेले नाही तर या आजाराने मृत्यू होणाऱ्यांची संख्या दरवर्षी 6 कोटी होऊन जाईल, असे मानले जात आहे. 21 व्या शतकात या आजारांवर नियंत्रण आणणं मोठं आव्हान असणार आहे. वेगाने बदलत चाललेली जीवनशैली, खाणंपिणं आणि शारीरिक व्यायामाचा आभाव यांमुळे जीवनावर विपरीत परिणाम होत आहे. जो घातक आहे. जगातील एक तृतीयांश लोकांचे आयुष्य निर्धारित वेळे अगोदरच नष्ट होत चालले आहे. कॅन्सर, मधुमेह, हृदय, श्वसनरोग आणि मानसिक आजार यांसारख्या असंक्रमण आजारांशी सामना करण्यासाठी योग्य पावले उचलली जात नाहीत, हे आपल्या देशाचे दुर्दैवच म्हटले पाहिजे.
आपल्या देशात कॅन्सर, हृदयरोग, मधुमेह आणि मस्तिष्क आघाताने मरणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. या आजारांवर खर्चही भरमसाठ केला जात आहे,मात्र त्याप्रमाणात परिणाम येताना दिसत नाहीत. वीस वर्षांपासूनच्या लोकांमध्ये या आजारांवर जनजागृती आणण्याची गरज आहे. व्यायामाचे महत्त्व आणि सकस अन्न यांचे मार्गदर्शन होण्याची आवश्यकता आहे. आणखी एका अहवालानुसार भारतातल्या 42 ते 64 वर्षे वयांतील 42 टक्के लोकांचे मृत्यू या आजारांनीच झाले आहेत. कॅन्सरवर जितक्या लवकर उपचार सुरू होतील, तितक्या लवकर हा आजार आटोक्यात येऊ शकतो. अलिकडच्या काळात कॅन्सर रुग्णांवर आधुनिक पद्धतीने उपचार होत आहेत. औषधे उपलब्ध आहेत,मात्र या औषधांच्या किंमती सामान्यांच्या आवाक्यात नाहीत. त्या स्वस्त होण्याची आवश्यकता आहे. मुळात आपल्या गावपातळीवरील आरोग्य सेवा पुरती खिळखिळी झाली आहे. आरोग्य, भौतिक सुविधा नाहीत.औषधांचा पुरवठा होत नाही. वैद्यकीय आधिकारी आणि इतर कर्मचारी यांची वर्षोंवर्षे भरती करण्यात आली नाही. त्यामुळे स्थानिक परिसरात उपचार वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे लोकांना महागड्या, शहरातल्या दवाखान्यात उपचार घ्यावे लागतात किंवा उपचाराभावी कुडत मरावे लागते. असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाययोजनांची गरज आहे. शासनाबरोबरच मोठमोठी देवस्थाने, सामाजिक संस्था यांनीही यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**पुण्याला आल्यानंतर पुण्यात अनेक ऐतिहासिक धार्मिक स्थळ आहेत त्यालाआपण आवर्जून भेट देत असतो. पुण्यातील असेच एक महत्त्वाचे स्थळ म्हणजे पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे श्री गणपती मंदिर. पुण्यात आल्यानंतर ह्या गणपतीचे दर्शन घेतल्याशिवाय अनेकांना चैन पडत नाही. भक्तांच्या नवसाला पावणारा, मनाला आनंद, समाधान, देणारा गणपती म्हणून हे मंदिर महाराष्ट्रातच नव्हे तर देश-परदेशात ही प्रसिद्ध आहे. मंदिरातील सुंदरशी मूर्ती भाविकांचे श्रध्दा स्थान आहे. माझा स्वतः चा अनुभव आहे.पुण्यात आल्यावर गणपतीचे दर्शन घेणारच.**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई हे पुण्यातील (१८९३) सुप्रसिद्ध मिठाईचे व्यापारी होते. श्रीमंत तर होते पण भविकही होते. पुण्यातील बुधवार पेठेत हल्ली दत्त मंदिर आहे त्या जागेवरच त्यांचा रहिवासी होता.. त्याकाळी पुण्यामध्ये आलेल्या प्लेगच्या साथीमध्ये श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांच्या मुलाचे देहावसान झाले. त्यामुळे ते स्वतः व त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई हे दोघेही दु:खी होते. त्यावेळी त्यांचे गुरू पुज्य श्री. माधवनाथ महाराजांनी त्यांचे सांत्वन केले.(पुज्य.माधवनाथ महाराजांची समाधी साऊथ तुकोगंज.इंदोर.येथे आहे.) व त्यांना सांगितले की, आपण काही काळजी करू नका, आपण एक दत्ताची आणि एक गणपतीची मूर्ती तयार करा व त्यांची रोज पूजा करा. हया दोनही दैवतांना आपल्या मुलाप्रमाणे सांभाळा. भविष्यात जसे मुले आपल्या आईवडिलांचे नाव उज्ज्वल करतात त्याप्रमाणे ही दोन दैवते तुमचे नाव उज्ज्वल करतील. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे शेठ यांनी दत्ताची एक संगमरवरी मूर्ती व गणपतीची मातीची मूर्ती बनवून घेतली. ह्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा लोकमान्य टिळकांच्या हस्ते झाली होती आणि त्यावेळी परिसरातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई, बाबुराव गोडसे, भाऊसाहेब रंगारी, श्री. मोरप्पाशेठ गाडवे उर्फ काका हलवाई, नारायणराव बाजेवाले उर्फ जाधव, नारायणराव भुजबळ, रामाराव बुटलेर, गणपतराव विठूजी शिंदे, सरदार परांजपे, शिवरामपंत परांजपे, गोपाळराव रायकर, नारायणराव दरोडे यांनी या समारंभाला हजर होते.
सन १८९४ साली लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. सन १८९६ साली श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची दुसरी मूर्ती तयार करण्यात आली व तिचा उत्सव होऊ लागला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांचे निधना नंतरही गणेशोत्सवाची परंपरा त्या परिसरातील नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी . परंतु त्यांनी सुरू केलेली गणेशोत्सवाची परंपरा त्या परिसरातील नागरिकांनी सुरू ठेवली. . या उत्सवाचे व्यवस्थापन सुवर्णयुग तरुण मंडळ करीत होते. सध्या ही मूर्ती कोंढवा येथील बाबुराव गोडसे पिताश्री वृद्धाश्रमातील मंदिरात आहे.
सन १९६७ साली आपल्या दगडूशेठ हलवाई गणपतीच्या अमृत महोत्सवानिमित्त सुवर्णयुग तरुण मंडळाच्या प्रतापराव गोडसे आदींनी गणपतीची नवीन मूर्ती बनविण्याचा संकल्प केला व त्यासाठी कर्नाटकचे प्रसिद्ध शिल्पकार श्री. शिल्पी यांना सांगितले. त्यांच्याकडून लहान मातीची मूर्ती नमुना म्हणून करून घेतली. बाळासाहेब परांजपे यांनी कार्यकर्त्यांना ती मूर्ती प्रोजेक्टरवरून मोठ्या पडद्यावर दाखविली व सर्वानुमते ती आधीच्या मूर्तीसारखी असल्याची खात्री पटल्यानंतर मोठया मूर्तीचे काम प्रत्यक्षात सुरू झाले.
पूर्ण मूर्ती तयार झाल्यानंतर श्री. शिल्पी यांनी त्याकाळी जे ग्रहण झाले त्या दिवशी संगम घाटावर ग्रहण संपेपर्यंत देवाची आराधना केली,. गणेश यंत्राची पूजा केली व त्यानंतर ज्या ठिकाणी मातीची मूर्ती तयार केली होती, त्याच ठिकाणी येऊन विधिवत धार्मिक गणेश याग केला, व त्यानंतर ते सिद्ध श्रीयंत्र मंगलमूर्तीच्या पोटामध्ये सर्वांसमक्ष ठेवले. शिल्पी यांनी जमलेल्या लोकांना या मंगलमूर्तीची तुम्ही सर्वांनी दररोज नित्य नियमाने पूजा करा व त्याचे शेवटपर्यंत पावित्र्य राखा असे सांगितले. त्याकाळी ही मूर्ती बनविण्याचा खर्च सुमारे ११२५/- इतका आला होता.

हा गणपती लोकमान्य टिळक यांचा काळात बसवला गेला.
ही मूर्ती तयार करण्याचे काम सुरू असताना त्यावेळी सूर्यग्रहण आले होते. त्या ग्रहणातील एका विशिष्ट वेळेत मूर्तीमध्ये गणेशयंत्र बसविले तर त्या मूर्तीचे तेज उत्तरोत्तर वाढत जाईल आणि या मूर्तीला देवत्व प्राप्त होईल अशी शिल्पी यांची श्रद्धा होती. त्यांच्या श्रद्धेचा मंडळाच्या कार्यकर्त्यांनीही आदर केला आणि धार्मिक पद्धतीने विधी करूनच ही मूर्ती घडविण्यात आली. शांत, प्रसन्न आणि पाहताच पावले थबकून राहावीत असे भाव या मूर्तीच्या चेहऱ्यावर आहेत. बैठया मूर्तीचे चारही हात सुटे असून डाव्या हातामध्ये मोदक आहे, तर उजवा हात वरद म्हणजे आशीर्वाद देणारा आहे. अन्य दोन हातांमध्ये कमळ आणि डोक्यावर मुगूट आहे. मूर्तीच्या सोंडेवरील नक्षीकाम हाही उत्कृष्ट कलाकारीचा नमुना आहे. या मूर्तीचे डोळे हे महत्त्वाचे वैशिष्टय. या डोळ्यांमध्येच मूर्तीची प्रसन्नता, सात्त्विकता आणि उदात्तता एकवटली आहे. कोठूनही पाहिले तरी गणपती आपल्याकडेच पाहात आहे याची प्रचिती दर्शन घेणाऱ्या भाविकाला येते. मूर्तीच्या बोलक्या डोळ्यांमधून व्यक्त होणारे भाव पाहून भक्त नकळतच नतमस्तक होतो. मंदिरातून लवकर पायच निघत नाही.
उत्सव काळात पाच किंवा अकरा नारळाचे तोरण अर्पण करण्यासाठी भाविकांची दर्शनासाठी रांग लागलेली असते. हे दगडूशेठ गणपतीचे एक खास



वैशिष्टय आहे. १९८४ मधील गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मंदिरामध्ये गणपतीची स्थापना झाली. या मंदिरासाठी ट्रस्टचे तत्कालीन अध्यक्ष प्रतापराव गोडसे, मामासाहेब रासने आणि आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले.
'कुली' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान अमिताभ बच्चन यांना जीवघेणा अपघात झाला होता. त्यावेळी जया बच्चन यांनी दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेऊन नवस केला होता. सुखरूप बरे झाल्यानंतर अमिताभ आणि जया बच्चन या दांपत्याने सोन्याचे कान अर्पण केले होते.अनेक कलाकार,राजकियनेतेदर्शनाला,येतात.
आधिचे मंदिर अपुरे पडू लागल्यानंतर २००२ मध्ये सध्याचे भव्य मंदिर उभारण्यात आले. ट्रस्टच्या तीनही प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या पुढच्या पिढीच्या हाती सध्या नेतृत्व आहे. त्यांनीही त्याच निष्ठेने आणि भाविकतेने सारे उपक्रम सुरू ठेवले आहे. गणपतीचे पावित्र्य जपले असून ट्रस्टच्या लौकिकामध्येही भर घातली आहे.स्वच्छता, शिस्त,कौतुकास्पद आहे.
गणेशोत्सव हा केवळ आपल्या मंडळापुरताच मर्यादित राहू नये या उद्देशाने उत्सवाला विधायक वळण प्राप्त करून देण्यासाठी ट्रस्टने राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा सुरू केली. गणेशोत्सवामध्ये ऋषिपंचमीला हजारो महिलांचा सहभाग असलेला अथर्वशीर्ष उपक्रम जगभर पोहोचला आहे.उत्सव काळात व इतरही वेळी गणेशयाग,आदी कार्यक्रम असतात.
ट्रस्टतर्फे कोंढव्यामध्ये देवदासी आणि अनौरस मुलांचा सांभाळ करून त्यांना योग्य शिक्षण देणारे बालसंगोपन केंद्र आणि पिताश्री वृद्धाश्रम चालविण्यात येत आहे. पिगोरी (ता. पुरंदर) गावामध्ये जलसंधारणाची कामे यशस्वी केलेल्या ट्रस्टतर्फे ससून रुग्णालयातील रुग्णांना उत्तम भोजनसेवा दिली जात आहे.धार्मिक,सामाजिक, व आरोग्य सेवा ह्या माध्यमातून संस्थेचे मोलाचे योगदान आहे.
ट्रस्टतर्फे दरवर्षी सादर केला जाणारा आकर्षक देखावा आणि केलेली विद्युत रोषणाई हा भाविकांना आकर्षीत करुन घेते. शतकोत्तर रौप्यमहोत्सवानिमित्त गणपतीला नवीन अलंकाराने सजवण्यात आले. भाविकांनी अर्पण केलेल्या सोन्यातून दगडूशेठ हलवाई गणपतीसाठी ४० किलो वजनाचे नवीन अलंकार करण्यात आले आहेत. साडेनऊ किलो वजनाचा रत्नजडित सुवर्णमुकूट, सूर्यकिरणांची नक्षी असलेले व रंगीत रत्नखडे जडवलेले कान, सातशे ग्रॅम वजनाचे शुंडाभूषण यासह रेशमी वस्त्रावर सोन्याच्या बुट्टया विणून तयार केलेला पोशाख व उपरणे या गणेशोत्सवात मूर्तीस अर्पण करण्यात आले. पु. ना. गाडगीळ सराफ पुणे, यांनी हे अलंकार घडवले आहेत. ५० कारागिरांनी पाच महिन्यात हे काम केले.
अगदी रस्त्यावरून जाणाऱ्या पादचाऱ्यांसही गणपती दर्शन अगदी सुंदर होते.उत्सवाचे काळात तसेच इतर वेळीही वर्षभरात दिलेल्या देणगीची पावती, प्रसाद, फोटोसह दिली जाते.तसेच तीर्थ, साखरफुटाण्याचा प्रसादही नेहमी करता ठेवलेला असतो.
आता दर्शनासाठी निर्बंध नसल्याने आपण मुक्तपणे दर्शन घेऊ शकतो.

# होरपळ



ज्ञानेश्वर गायके
मो.नं. 9403384889

आधुनिक केसरी

**ज्ञानेश्वरने बी. एड. साठी पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गावापासून ऐंशी किलोमीटर अंतरावर असलेल्या शहरातील कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन बी. एड. ही अगदी चांगल्या मार्कांने पास होऊन शिक्षक होण्याचं स्वप्नं जे खूप पूर्वीपासून हृदयाच्या गाभाऱ्यात जपून ठेवलं होतं त्याच्या परीपूर्ती साठी घरी आला व लगेच गावाजवळच्या विनाअनुदानित शाळेत मुलाखत देण्यासाठी गेला. तिथं निवडही झाली, पण दीड लाख रुपये डोनेशनची मागणी शाळेच्या मालकांनी केली व आता फक्त पैसे भरायचे इतकाच अवकाश राहिला होता... स्वप्नपूर्तीचे आकाश जसे खिशात आले होते..पण ऐनवेळेला बापानं पैसे भरण्यास नकार दिला व ज्ञानेश्वरचे स्वप्न अपूर्ण राहिले.**

आज कधी नव्हे तो ज्ञानेश्वर खूप आनंदात होता. मातीवर पाय असून त्याच्या मनाचे पाखरू आकाशात घिरट्या घालू लागले होते. कारणही तसेच होते आज तो प्रथम श्रेणीत बारावी उत्तीर्ण झाला व त्याचा डी. एड. ला नंबर लागला अन् मास्तर झालो असे गोड स्वप्नं अगदी जागेपणी पडू लागले होते. पण नियतीला काही वेगळेच मंजूर होते. त्याने औरंगाबाद व जालना या दोन जिल्ह्यात डी. एड.साठी अर्ज दाखल केला, पण गावातील शिक्षकांनी दूर कोकणात अर्ज करा म्हणजे तुमच्या मुलाचा नंबर नक्की लागेल. जवळच्या जिल्ह्यात स्पर्धा खूप आहे व मार्क त्याला थोडे कमी आहेत असे सांगूनही ज्ञानेश्वरच्या बापाने काही ऐकले नाही. कारण दूरच्या जिल्ह्यात अर्ज दाखल करण्यासाठी खर्च जास्त येत होता. दुर्दैवाने ज्ञानेश्वरचे औरंगाबाद जिल्ह्यात वेटिंगला नाव असतानाही निवड झाली नाही. डी. एड. ला नंबर लागला नाही व पुढं शिकून काही फायदा नाही म्हणून आता ज्ञानेश्वर गावातील नदीवर धरण बांधण्याचे काम चालू
होते तिथं तीस रुपये हजेरीने कामाला जाऊ लागला. पावसाळा तोंडावर आल्यामुळे धरणावरील काम बंद झाले होते.आता प्रत्येक जण आपापल्या वावरात पेरणीसाठी मशागत करून पावसाची वाट पाहू लागला होता. मिरगाच्या सरींनी अगदी योग्य वेळी हजेरी लावली म्हणून ज्ञानेश्वरचे कुटूंबीय ही पेरणीच्या कामास जुंपले. कारण ज्ञानेश्वरच्या कुटुंबाकडेही वडिलोपार्जित दहा एकर कोरडवाहू जमीन होती. पेरणी वेळेवर झाल्यामुळे कोवळं पीक धरतीच्या कुशीतून तरारून आलं होतं. असेच दिवसामागून दिवस जात होते. आषाढात कपाशी गुडग्याला शिवली, पण तण खूप माजलं होतं म्हणून ज्ञानेश्वर त्याच्या बापासोबत कपाशीतील तण काढण्याचे काम करत होता.
'ज्ञानेश्वर, तू या वर्षी घरी राहायला नको होतं. पुढं तेरावीला ॲडमिशन घ्यायला हवं होतं. वडील म्हणाले. 'पुढं शिकून बी. एड.करावं लागतं व शिक्षक होण्यासाठी संस्था अध्यक्षाला खूप पैसे दयावे लागतात की ते आपल्याकडे नाही.म्हणून आता शिक्षण बंद करून दुसरं काहीतरी पोटापाण्यासाठी काम करू म्हणतो दादा.' ज्ञानेश्वर बोलता झाला.
त्या वेळी त्याच्या वडिलांनी त्याला समजावून सांगितले की, 'तू पुढं शिक, तुझ्या नोकरीसाठी आपण कुठूनही पैसे आणू व भरू. वेळप्रसंगी तुझ्या वाट्याचे वावरही विकू.' या बापाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून पुढील वर्षी ज्ञानेश्वरने तालुक्याच्या गावी बी. ए.च्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेतला व बी. ए.च्या पहिल्या दोन वर्षे झपाटल्यागत कॉलेजच्या ग्रंथालयातील पुस्तकं वाचण्याचा सपाटा लावला. आठवड्यात एकदा कॉलेजमध्ये जायचे व पुस्तकं बदलून घरी यायचे. घरी बाकी दिवस लोकांच्या ट्रॅक्टरवर वाळू, मुरूम, दगड भरणे, उन्हाळ्यात लोकांच्या वावरातील पालकाट्या तोडणे कधी हे काम नसले की धरणावर मजुरी करणे. बांधकाम मिस्तरीच्या हाताखाली काम करणे किंवा आपल्या वावरात कापूस वेचणे असे कष्टाची कामे दिवसभर करून रात्ररात्र अभ्यास करणे असा दिनक्रम सुरू केला. या काळात मराठी हिंदीतील खूप कथा, कादंबऱ्या व इतर वैचारिक पुस्तके वाचून झाली व पदवीच्या तिसऱ्या वर्षी गावातून एस.टी.ने अपडावून करून कॉलेज केले व प्रथम वर्गात बी. ए. पास झाला. पुढे ठरल्याप्रमाणे बी.एड.साठी पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गावापासून ऐंशी किलोमीटर अंतरावर असलेल्या शहरातील कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन बी. एड. ही अगदी चांगल्या मार्कांने पास होऊन शिक्षक होण्याचं स्वप्नं जे खूप पूर्वीपासून हृदयाच्या गाभाऱ्यात जपून ठेवलं होतं त्याच्या परीपूर्ती साठी घरी आला व लगेच गावाजवळच्या विनाअनुदानित शाळेत मुलाखत देण्यासाठी गेला. तिथं निवडही झाली, पण दीड लाख रुपये डोनेशनची मागणी शाळेच्या मालकांनी केली व आता फक्त पैसे भरायचे इतकाच अवकाश राहिला होता... स्वप्नपूर्तीचे आकाश जसे खिशात आले होते..पण ऐनवेळेला बापानं पैसे भरण्यास नकार दिला व सांगितले की मी आताच थोड्या दिवसांपूर्वी गावात जे नवीन घर घेतले आहे त्याचे कर्ज अजून डोक्यावर आहे अन् आता नवीन कर्ज कुठून काढायचे. त्यावेळी ज्ञानेश्वरने बापाला आठवण करून दिली की माझ्या वाट्याचे वावर विका, पण मला नोकरीस लावा अन् तुम्ही तसा शब्द दिला होता. पण त्यावेळी वडिलांनी सांगितले की तुला शिकवले आहे त्यामुळे वावरात वाटा मिळणार नाही..
अन त्याच वेळी ज्ञानेश्वरच्या लक्षात आले की तो पूर्णपणे गाळात फसला कधी ही बाहेर न निघण्यासाठी..त्याची झालेली फसवणूक अन् वाट्याला आलेलं ओसाड आयुष्याचं माळरान अन बापानं पदरात टाकलेली आयुष्यभराची होरपळ सोबतीला घेऊन तो पुढच्या प्रवासाला निघाला..की तिथं आता कोणताच थांबा त्याला अडवू शकणार नव्हता.





सौ. शुभदा कुलकर्णी

# सोबत

आधुनिक केसरी

**पहाटे नेहमीप्रमाणे जाग आली तर रात्री वाटलेल्या भीतीचा लवलेशही उरलेला नव्हता मनात. फटाफट लाईट लावल्या सगळ्या घरात. उशाजवळ ठेवलेला मोबाईल घेऊन जरा चाळला. आणि रात्री गरज नसतानाही हायस्पीडमध्ये लावलेला फॅन बंद करून टाकला. कारण बाहेरून कसलेही आवाज आले तरी ते दडपून टाकण्यासाठी फॅनची गरज उरलेली नव्हती. रात्री बाहेर कुठे खसपसले, घुस काही करत असली आणि जरा कुठे खुट जरी वाजले तरी काळजाचे पाणी पाणी होते नुसते. निबरगट्ट होतच नाही काळीज अजूनतरी हे.**

शिवाय थोड्या वेळात तर उजाडणार असते. रात्री सुद्धा हाच विचार करत अंथरूणावर पडलेले असते, ७ तासाचा तर प्रश्न अवघा. रोजच्यासारखी सकाळ होणारच आहे. अधेमधे काहीही होणार नाही. दारं फोडून, ग्रील तोडून कोणीही आत येणार नाही.. हे पक्के ठाऊक असते. तरी थोडी धडधड होतेच.

सासूबाई ज्या खोलीत असायच्या त्या खोलीचे दार तर बंद करून टाकते संध्याकाळीच. जिवंत असताना एखादी शिक्षा भोगावी अशी त्या माझ्याकडून सेवा करून घेत होत्या. अपेक्षितच नव्हते त्यांना हे. कृतज्ञता त्यांच्या बोलण्यात तर नव्हतीच कधी पण स्वरातही कधी जाणवली नव्हती. एखाद्या लहान मुलांचे करावे तसे मी त्यांचे करीत होते. एकटीला त्या पेलत नव्हत्या. शेवटी शेवटी बारीक झाल्या होत्या तरी हाड मजबूत होते. ९१ वय झाले तरी. ह्यांची मदत असायचीच मग मला. बऱ्याच वेळा त्यांना उलटी व्हायची. अगदी आंघोळ करून बेडवर झोपवले की दोन मिनिटांत उलटी करून कपडे भरवून टाकायच्या. हे म्हणायचे "आई तुला बाथरूममध्ये उलटी करायला काय झाले होते ग?" पण त्यांच्या तर कुठे हातात होते ते. पण मला झालेला त्रास बघून यांचा जीव तुटायचा. तेच मला खूप वाटायचे. दोन-तीन महिन्यांचाच तो काळ, पण भला मोठा वाटला होता तो तेव्हा.

त्यांची ती खोली. त्यात त्यांचा तो सिंगल बेड. बेडवरून लोंबकळणारी त्याची ती युरीनची बॅग. ती बॅग ठेवायला केलेला एक स्टिलचा डबा. बेडला चिकटून ठेवलेले ते टेबल. त्यावर त्यांची औषधे. पाण्याचा तांब्या, बॅटरी. इथे इन्व्हर्टर आहे लाईट कधीच जात नाही. हे त्यांना बऱ्याच वेळा सांगून झाले होते. पण लाईट जाण्याची धास्ती शेवटपर्यंत त्यांच्या मनात होती. त्यामुळे बॅटरी सतत त्यांच्याजवळ त्या ठेवायच्या.

नव्वदी ओलांडल्यानंतर हृदयाच्या झडपा त्यांच्या नीट काम करीत नव्हत्या. आणि त्याला काही उपाय नाही असे डॉक्टरनी सांगितले होते. तसेच माझी मैत्रिण डॉ.जयश्री मासाळ यांनीही ."आता शेवटी त्यांचे हाल करत त्यांचे आयुष्य विनाकारण वाढवू नका" असे बजावले होते.

हे सगळं आठवत राहतं. दिसत राहतं. पण एकटी असल्यावरच बहुदा जास्ती. म्हणूनच ते दारच बंद करून टाकते झोपण्या पूर्वीच. त्या असतानाही एकदा असेच मी वैतागून दार लावून घेतले होते. त्यांना भ्रम झाल्यासारखे झाले होते त्यादिवशी. सकाळपासून ५० वेळा गाठ नीट बांधून देऊनही "माझ्या परकरची नीट गाठ बांध म्हणून सारख्या हाका मारत होत्या. रात्री १० वाजता शेवटी दार लावून घेतले त्यांच्या खोलीचे.

पण नंतर आवाज बंद झाला त्यांचा. पहाटे दार उघडून पाहिले तर परकर एका बाजूला टाकून त्या एखाद्या लहान मुलासारख्या झोपल्या होत्या. शेवटी-शेवटी ती साडी त्यांनाच पेलवत नव्हती. परकर ब्लाउजच घालायचे त्यांना. उलटी झाली तर ब्लाऊज काढायला सोपे जायचे मला गाउनपेक्षा.

माझी आजी पण शेवटच्या दिवसात त्याच खोलीत असायची. सगळे विधी अंथरूणातच चालायचे. दुपारच्या सुट्टीत मी धावत-पळत घर गाठायचे. तिला साफ करून सगळे ते कपडे बाहेरच्या अंगणात टाकून त्यावर बोअरवेलचा पाईप धरायचे. पाण्याला फोर्स चांगलाच असल्यामुळे कपडे स्वच्छ व्हायचे. हात न लावताही. मग पुन्हा साबण लावून धुवायचे मी ते कपडे. फळांचा ज्यूसही तिला पचत नव्हता. अंथरूण तर भरवून ठेवायचीच पण भिंतीला पण तिने सोडले नव्हते. तीही रंगवून टाकायची. सलायन लावले की तेवढ्यापुरते तिला बरे वाटायचे. पण शेवटी जगणार नाही ती आता हे डॉ. नी सांगितल्यामुळे आई तिला सातारला घेऊन गेली. ती तिथेच गेली मग.

पण त्या दोघींचे ही भास अजुनही मला होतात. आणि तेही एकटी असल्यावरच.एरवी हे भ्रम कुठे गायब होतात कोण जाणे? तरी "एकटी भूतासारखी रहात जावू नकोस एवढ्या मोठ्या घरात "असे जवळचे लोक सांगत असतात. पण मी हे मनावर कधीच घेत नाही. मला एकटीला का जमू नये घरात रहायला? हा प्रश्न मीच मला विचारत राहते.

परवा गुरखा आला होता. त्याचा पगार न्यायला. तर म्हणाला "२-३दिवसापूर्वी एक माणूस तुमच्या गेटच्या आत गाडीजवळ उभा होता. मला पाहिले की वॉलकंपाउंडच्या भिंतीवरून उडी मारून पळून गेला तो ". काहीतरी ट्रिक करून गाडीतले पेट्रोल चोरायचे काम एक मुलगा करतो आहे हे मला आधीच कळालेले होते. पण तो आमच्या ही अंगणात येईल असे वाटले नव्हते. तो घरफोडीचे काम करणार नाही असे पण वाटते मला. पण पैशाचा अभाव माणसाला कोणत्या थराला घेऊन जाईल हेही सांगता येत नाही म्हणा. पण गुरखा हे मला घाबरवण्यासाठी सांगत होता की चोर पळवून लावला म्हणून बक्षीस मिळावे म्हणून सांगत होता कोण जाणे? पण शेवटी "एकट्या राहताय तर काळजी घेत जा. मी आहेच. "हेही सांगून गेला शेवटी. बाई माणूस एकटेच राहते आहे हे त्याला कसे कळाले कोण जाणे? मी तर कुणालाच हे कधी सांगत नाही. हे काही कामासाठी, दवाखान्यात दाखवण्यासाठी बऱ्याच वेळा पुण्याला जातात. पण ही कामवाली आमची. दरवाजातून आत पाऊल टाकताच"निशांतचे पप्पा अजून पण नाही आले होय? "हे तिचे रोजचे ठरलेले वाक्य असायचेच. तेही जोरात. मग तिलाही थोडे दिवस सुट्टी दिली. नसत्या चौकशा तिच्या. पण थोडावेळ घर जीवंत वाटते एवढे मात्र खरे. आता दूध घालायला एक मुलगा येतो. पण तो व्हरांड्यातून आत सुद्धा कधी डोकावत नाही. पण मी दूध किती घेते यावरून तर त्याला कळतेच. मी एकटी आहे ते.

पण खरंच सांगते हे असले एकटेपण कधी अंगावर येत नाही माझ्या. करमत नाही, वेळ जात नाही असेही कधी होत नाही मला. पण बाहेर पडताना कुलूपं लावायचा तेवढा त्रास वाटतो मला. रात्री टिव्ही पण लावत नाही. सुरू करायलाच शिकत नाही. त्यामुळे सुरू करायचा प्रश्नच नसतो कधी. पण तरी मी एकटी कधी कुठे असते? सतत विचारात, डोक्यात असतेच ना कुणी ना कुणी सोबत. त्यामुळे माझी भ्रमंतीही चालूच राहते नेहमी कधी इथे तर कधी तिथे. कुठे कुठे घेऊन जातात ते मला. कधी ती आनंदाची पर्वणी. तर कधी डोळे भरभरून वाहवणारी. माझी माझी म्हणून असणारी ही माणसं.त्यांची सोबत ही निरंतरची.

# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ते जगदीप धनखड : भारतीय उपराष्ट्रपतीपदाची परंपरा

आधुनिक केसरी

**सर्वसामान्य भारतीय माणसाला राज्यसभा, विधान परिषद, उपराष्टपती या निवडणुकांविषयी फारशी माहिती नसते.वृत्तपत्रात बातम्या येतात तेव्हा भारतीय मतदार राजाला या भारतीय राज्यघटनेतील व भारतीय राज्यव्यवस्थेतील कळीच्या घटकांविषयी माहिती होते. काही वेळेला या निवडणुका बिनविरोध होतात. त्यामुळे त्या फार चर्चेत येत नाहीत. अर्थात महाराष्ट्रात गेल्या काही दिवसात झालेल्या घडामोडीमुळे आपण राजकीय घडामोडीबाबत बहुश्रुत झालो आहोत. पण त्यात माध्यमनिर्मित रंजकतेचा भाग अधिक आहे. आयपीएल आणि सिनेमाबाबत आपण जितके जागरूक असतो तितकेच आपण राजकीय बाबतीत जागरूक असणे आवश्यक आहे. अन्यथा उपराष्ट्रपतीपदी श्री. जगदीप धनखड यांची निवड ही आपल्यासाठी केवळ निव्वळ बातमी ठरेल. तशी ती नाही यासाठीच हा लेखनप्रपंच !**

मुळात उपराष्ट्रपतीपद कशासाठी? असा प्रश्न येतो आणि ते करतात काय? हा दुसरा प्रश्न. या प्रश्नांची उत्तरे भारतीय संविधान देते. संविधानाच्या पाचव्या भागात पहिले प्रकरण भारताच्या कार्यकारी यंत्रणेविषयी आहे. त्यातील कलम ६३ ते ७१ ही कलमे उपराष्ट्रपतीपदासंदर्भातील आहेत. या तरतुदीकडे वळण्यापूर्वी आपण आजवर भारताच्या उपराष्ट्रपतीपदाचा मान कुणाला मिळाला ते पाहू.

## राज्यपाल पदाची पृष्ठभूमी

भारताचे पूर्व उपराष्ट्रपती डॉ झाकीर हुसेन यांनी बिहारचे राज्यपालपद भूषविले होते. वराह गिरी व्यंकट गिरी हे तिसरे उपराष्टपती १९५७ ते १९६७ अशी दहा वर्षे उत्तर प्रदेश, केरळ व तत्कालीन म्हैसूर या राज्यांचे राज्यपाल होते. बी. डी. जत्ती हे पोन्डेचेरीचे उपराज्यपाल व ओडीसाचे राज्यपाल होते. डॉ शंकरदयाळ शर्मा हे आंध्र प्रदेश, पंजाब व महाराष्ट्राचे राज्यपाल होते. श्री. कृष्ण कांत हे आंध्र प्रदेश व तामिळनाडूचे राज्यपाल होते.

## माजी मुख्यमंत्री असलेले उपराष्ट्रपती

बी. डी. जत्ती हे पूर्व उपराष्टपती हे जमखंडी या संस्थानचे व तत्कालीन म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री होते. शंकरदयाळ शर्मा हे तत्कालीन भोपाळ राज्याचे मुख्यमंत्री राहिलेले होते. श्री. भैरोसिंह शेखावत हे राजस्थानचे तीन वेळेला मुख्यमंत्री होते.

## भारतरत्न पुरस्काराने सन्मानित पूर्व उपराष्ट्रपती




भारताच्या उपराष्टपती पदावर काम केलेल्या डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन,डॉ झाकीर हुसेन, श्री. व्ही. व्ही. गिरी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

## लेखक उपराष्ट्रपती

डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन हे जागतिक कीर्तीचे तत्वज्ञ होते. ते राष्ट्रपती झाले तेव्हा राजकीय तत्वज्ञानाचे जनक प्लेटो यांच्या स्वप्नातील तत्वज्ञ राजा ही संकल्पना साकारल्याचे मानले गेले. डॉ झाकीर हुसेन हे नामवंत शिक्षण तज्ञ होते. त्यांनी प्लेटोच्या गणराज्य या ग्रंथाचे उर्दू भाषांतर केले होते. उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू हे ही नियमितपणे स्तंभलेखन करत असत.

## व्ही. व्ही. गिरी आणि कॉंग्रेसमधील फूट

व्ही.व्ही. गिरी हे राज्यपाल होण्यापूर्वी केंद्रीय कामगार मंत्री होते. त्यापूर्वी ते भारताचे श्रीलंकेतील उच्चायुक्त होते. १९६७ साली ते उपराष्ट्रपती झाले. १९६९ साली तत्कालीन राष्ट्रपती झाकीर हुसेन यांचे निधन झाले. तेव्हा कॉंग्रेस पक्षातील एका गटाने नीलम संजीव रेड्डी यांना राष्ट्रपती पदासाठी उमेदवारी दिली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा मात्र कॉंग्रेसच्या रेड्डी यांना पाठींबा नव्हता .त्यांनी कॉंग्रेस पक्ष सदस्यांना स्वविवेकाने मत देण्याचे आव्हान केले होते. तत्कालीन उपराष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी हे राष्ट्रपती पदासाठी कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार नव्हते. मात्र ते राष्ट्रपती पदी निवडून आले.

| क्र | उपराष्ट्रपती | कालावधी | पुढील पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन | १३ मे १९५२ ते १२ मे १९६२ | राष्ट्रपती | १३ मे १९६२ ते १३ मे १९६७ |
| २ | डॉ जाकीर हुसेन | १३ मे १९६२ ते १२ मे १९६७ | राष्ट्रपती | १३ मे १९६७ ते ३ मे १९६९ |
| ३ | वराह गरिी व्यंकट गरिी | १३ मे १९६७ ते ३० ऑगस्ट १९६९ | राष्ट्रपती | २४ ऑगस्ट १९६९ ते २४ ऑगस्ट १९७४ |
| ४ | गोपाल स्वरूप पाठक | ३१ ऑगस्ट १९६९ ते ३० ऑगस्ट १९७४ | ------ | ------ |
| ५ | बी डी जत्ती | ३१ ऑगस्ट १९७४ ते ३० ऑगस्ट १९७९ | ------ | ------ |
| ६ | मोहम्मद हदियततुल्लाह | ३१ ऑगस्ट १९७९ ते ३० ऑगस्ट १९८४ | ------ | ------ |
| ७ | आर वेंकटरामन | ३१ ऑगस्ट १९८४ ते २४ जुलै १९८७ | राष्ट्रपती | २५ जुलै १९८७ ते २५ जुलै १९९२ |
| ८ | डॉ शंकरदयाल र्शमा | ३ सप्टेंबर १९८७ ते २४ जुलै १९९२ | राष्ट्रपती | २५ जुलै १९९२ ते २५ जुलै १९९७ |
| ९ | के आर नारायणन | ३१ ऑगस्ट १९९२ ते २४ जुलै १९९७ | राष्ट्रपती | २५ जुलै १९९७ ते २५ जुलै २००२ |
| १० | कृष्णकांत | २१ ऑगस्ट १९९७ ते २७ जुलै २००२ | ------ | ------ |
| ११ | डॉ भैरोसहिं शेखावत | १९ ऑगस्ट २००२ ते २१ जुलै २००७ | ------ | ------ |
| १२ | मोहम्मद हमीद अन्सारी | ११ ऑगस्ट २००७ ते ११ ऑगस्ट २०१७ | ------ | ------ |
| १३ | एम वेंकय्या नायडू | ११ ऑगस्ट २०१७ ते ऑगस्ट २०२२ | | |
| १४ | जगदीप धनखड | ऑगस्ट २०२२ पासून पुढे | | |

या मुद्द्यावरून कॉंग्रेस पक्षात फुट पडली. इंदिरा कॉंगेस पक्षाची स्थापना झाली. काळाच्या ओघात इंदिरा कॉंग्रेस हाच मूळ व खरा कॉंग्रेस पक्ष ठरला.

## उपराष्ट्रपती जगदीप धनखड

नवे उपराष्टपती जगदीप धनखड हे बंगालचे राज्यपाल होते. जनता दलाचे खासदार होते तसेच पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. उपराष्ट्रपती जगदीप धनखड हे मुळचे राजस्थानचे आहेत. पूर्व उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत हेही राजस्थानचे होते. सध्याचे लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला हेही राजस्थानचे आहेत.

## उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीतील विरोधी उमेदवार

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत उभ्या राहिलेल्या मात्र निवडून न आलेल्या व्यक्तीही तितक्याच महत्वाच्या असतात. आत्ताच्या निवडणुकीतील कॉंग्रेसच्या उमेदवार मार्गारेट अल्वा या केंद्रात मंत्री होत्या. विशेष म्हणजे त्यांच्या सासूबाई व्हायोलेट अल्वा याही राज्यसभेच्या उपसभापती होत्या. याहून विशेष म्हणजे मार्गारेट अल्वा यांचे सासरेही त्याच काळात राज्यसभेचे सदस्य होते. यापूर्वी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनाही २००२ साली कॉंग्रेसने उपराष्ट्रपती निवडणुकीत उमेदवारी दिली होती. शिंदे पुढे केंद्रीय गृहमंत्री झाले. माजी राष्ट्रपती प्रतिभा देवीसिंह पाटील ह्या १९८६ ते १९८८ या काळात राज्यसभेच्या उपसभापती होत्या.

## उपराष्ट्रपतींची घटनात्मक भूमिका

भारतीय राज्यघटनेतील कलम ६३ ते कलम ७१ मध्ये उपराष्ट्रपतीपदासाठी तरतुदी करण्यात आल्या आहेत. कलम ६४ नुसार भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात. इथे लक्षात घेतले पाहिजे की राज्यसभा हे राज्यांचे सभागृह असते. राज्यसभा हे अमेरिकेतील सिनेटप्रमाणे राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. अमेरिकेतही उपराष्ट्रपती सिनेटचे पदसिद्ध सभापती असतात.

अमेरिकेत काही कारणाने राष्ट्रपती पद रिकामे झाल्यास उपराष्ट्रपती उर्वरित पूर्ण काळासाठी राष्ट्रपती होतात.

भारतात अश्या परिस्थितीत तात्पुरत्या स्वरुपात उपराष्ट्रपती यांचेकडे कार्यभार येतो. मात्र हा कायमस्वरूपी पदभार नसतो. उपराष्ट्रपती जेव्हा राष्ट्रपती म्हणून काम पाहतात तेव्हा त्यांना राष्ट्रपतींचे सर्व अधिकार असतात. ही तात्पुरती व्यवस्था असते. त्यानंतर राष्ट्रपती पदासाठी निवडणूक होते.

## राज्यांच्या हितरक्षणात उपराष्ट्रपतींची अप्रत्यक्ष भूमिका

इंग्लड हे एकात्म स्वरूपाचे राज्य आहे. एकात्म राज्य याचा अर्थ इंग्लड भौगोलिक दृष्ट्या लहान देश असल्यामुळे तेथे भारताप्रमाणे घटकराज्य सरकार नसते. इंग्लडमध्ये शहरपातळीवर नगरपालिका व त्यानंतर थेट केंद्र सरकार आहे. त्यामुळे तिथे घटकराज्यांचे प्रतिनिधित्व करणारे राज्यसभा किवा सिनेट असे सभागृह अस्तित्वात नाही. याउलट अमेरिका ,क्यानडा ही संघराज्य आहेत. कारण अमेरिका, क्यानडा हे भौगोलिकदृष्ट्या खूप मोठे देश आहे. त्यामुळे तेथे घटकराज्य सरकार आहेत. घटकराज्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. त्यासाठी तेथे संघराज्यव्यवस्था स्वीकारली आहे. भारत इंग्लडप्रमाणे एकात्म राज्य नाही. पण अमेरिका, क्यानडा प्रमाणे पूर्णपणे संघराज्य नाही. राज्यशास्त्राचे अभ्यासक भारताला अर्धसंघराज्य असे म्हणतात. भारतात राज्यसभा हे राज्यांचे सभागृह आहे. या राज्यसभेचे पदसिद्ध सभापतीपद उपराष्ट्रपतींकडे असते. एकप्रकारे राज्यांच्या अधिकारांचे रक्षण करण्यात उपराष्ट्रपती महत्वाची भूमिका बजावू शकतात.

## स्वतंत्र व निष्पक्ष उपराष्ट्रपतीपदाची भारताची परंपरा

भारताचे प्रथम उपराष्टपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन हे उपराष्ट्रपती होण्यापूर्वी भारताचे रशियातील राजदूत होते . स्टालिन हा साम्यवादी रशियाचा हुकुमशहा होता .साम्यवादी व्यवस्थेत स्वतंत्र विचाराना थारा नसतो . मात्र डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन हे हे भयमुक्त तत्वज्ञ होते .त्यांनी प्रसंगी स्टालिनलाही आपले म्हणणे सुनवायला कमी केले नाही. कृष्णकांत हे भारताचे माजी उपराष्ट्रपती होते. त्यांचे निधन झाले तेव्हा त्यांच्या मागे कोणती संपत्ती नव्हती. कृष्णकांत यांनी आयुष्यभर चरख्यावर सुत कातले. त्या सुतापासून बनविलेले दोन सदरे पायजमे त्यांनी आयुष्यभर वापरले. कृष्णकांत हे राज्यसभेचे सभापती होते तेव्हा त्यांनी समाजातील वंचित वर्गासाठी आपले अधिकार वापरले. ते सभापती असताना जेष्ठ समाजसेवक, चित्रकुटग्राम विकास प्रकल्पाचे निर्माते भारतरत्न पुरस्काराने सन्मानित नानाजी देशमुख हे राज्यसभेत राष्ट्रपती नियुक्त सदस्य होते. कृष्णकांत व नानाजी देशमुख यांच्यातील राज्यसभेतील संवाद स्मरणीय स्वरूपाचा आहे.

श्रीनिवास भोंग
मो. 9423783235

# पवार कुटुंब आणि ईडी, आयकर, सीबीआय

आधुनिक केसरी

**सर्वमान्य नेते, महाराष्ट्राचे धुरंधर नेते, आणि त्यांचे कुटूंबातील सदस्य, सुप्रिया सुळे, अजीत पवार आणि रोहीत पवार यांचेसह अजित दादांचे चिरंजीव पार्थ पवार हे आता ईडीच्या रडारवर आले आहेत. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर महाराष्ट्राचे राजकारणात सर्वेसर्वा झालेले शरदराव पवार साहेब यांनी वसंतदादा पाटील यांचे पाठीत खंजीर खुपसवून सत्ता मिळवली. तिथपासून त्यांना चटक लागली आणि जिथे तिथे ते दगाबाजी करून बाजी मारायच्या छंदात अडकले ते पून्हा बाहेर नाही पडू शकले. मग स्वपक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मध्ये येणे जाणे चालू झाले.**

राजीवजींचे हत्येनंतर साहेबांनी सोनिया गांधी यांना पंतप्रधान होण्यापासून रोखले, हे एवढेच एकमेव चांगले काम, आपल्या राजकीय जीवनात आणि प्रदीर्घ कालखंडात साहेबांनी केले आहे. हे एक पून्यकर्म सोडता आयुष्यभर फक्त काड्या करणे, दगाफटका करणे, घराघरात संघर्ष उभा करणे, डुख धरुन काटा काढणे, चावा घेणे, गरळ ओकणे, भावा भावात, आई मुलात, भांडणं लावणे आणि तमाशा पाहात बसणे एवढेच कार्य केले आहे. मुसलमानांचे लांगुलचालन करणे, त्यांच्या नेत्यांना अभय देवून, नवनवीन कल्पना सुचवत सरकारी खजीना लुटण्यास मदत करणे, इफ्तार पार्ट्या झोडणे, ॲरेंज करणे, यातच इतिकर्तव्यता मानली. सकाळ पेपर कटकारस्थाने करूनच ताब्यात घेतला. अतिशय खोल विचार करून विविध कांड करतात असा सर्रास सर्व जनतेचाच विश्वास आहे.

अंधभक्त साहेबांना धुरंधर समजतात तर अंध विरोधक साहेबांना महामेरू समजतात. सुप्रिया सुळे साहेबांच्या कन्या, साहेबांनी गुरुमंत्र देऊन तयार केलेल्या राजकारणी. पण ताईंचे नावावरील अनेक व्यवहारांचे आणि व्यवसायाचे मास्टर माईंड साहेबच. सुप्रिया सुळे ताईची वांगी आणि वाग्यांचे उत्पन्न हा जाहीर चर्चेचा विषय झाला आहे. साहेब, नाटकं करण्यात आणि समोरच्यांना नाट्यमयपणे गुंडाळण्यात ही वाकबगार आहेत. अजितदादा रोखठोक बोलणारे असले तरी सिंचन क्षेत्रातील गोंधळ त्यांचे अंगाशी येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सोबत सुनील तटकरे पण अडकतील. मध्यंतरी पार्थ अजितदादा पवार यांच्या मुंबई येथील कार्यालयात कांही चौकशी धाडी पडल्या होत्या. पण सिंचन घोटाळा आणि याधाडी 80 तासाच्या शपथविधी दरम्यान जरा तडजोडीतून बाजूला फेकल्या गेल्या होत्या, त्याही आता लवासा सह पून्हा चर्चेत येतील.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दहा पंधरा वर्षाचे सत्ताकाळात ही अनेक भ्रष्ट विषय ऐरणीवर आहेत. लवासा,



श्रीनिवास पाटील यांच्या मदतीने केलेला येरवडा जमीन घोटाळा, शेती म्हणजे कृषी क्षेत्रातील, दुष्काळ, ओला आणि सुका दोन्हीही. तसेच महीला बचत गटांचे माध्यमातून सुप्रिया सुळे यांना केलेली मदत सर्वश्रुत आहेच. सध्या साहेब मी पंतप्रधान पदाचा उमेदवार नाही. परंतू नरेंद्र मोदी विरोधकांना एकत्र आणण्यासाठी झटणार म्हणत आहेत. चार खासदारांच्या शिदोरीवर साहेब आणि ताई यांचेही पोट भरणार नाही. श्रीनिवास पाटलांना साहेबांनी एवढे देऊन ठेवले आहे की दहा पिढ्या उधळ्या निघाल्या तरी श्रीनिवास पाटील यांच्या खजीन्याला धक्का ही लागणार नाही.

समुद्रातून शंभर तांबे भरून काढल्याने समुद्राला फरक पडत नाही, तसे श्रीनिवास पाटील यांचे आहे.

साहेब, फक्त कांही चमत्कार झाला तरच विरोधकांचे नेते होऊ शकतील. कारण ममता बॅनर्जी, चंद्रशेखर राव, जगमोहन रेड्डी, द्रमुक चे स्टॅलिन, बीजू जनता दलाचे नवीन पटनायक, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंह, अखिलेश यादव, आणि नितीशकुमार यापैकी कोणाचाच विश्वास एनसीपी वर नाही. फक्त फारूख अब्दुल्ला तेवढे शरद पवार यांचे बाजूने उभे राहतील. कथीत संबंध अनुत्तरीत आहेत. दाऊद इब्राहिम, तेलगी, यांचेशी साहेबांचे संबंध आहेत की नाही हे वादग्रस्त आहे.

एकंदर काय तर आमचे सारखे साहेबांचे खंदे समर्थक संभ्रमावस्थेत आहेत. कट्टर मराठा वाद आणि जातीजातीतील तेढ निर्माण करण्याचे कसब वाखाणण्या जोगे आहे. रोहीत पवार कुठे कुठे अडकेल माहीत नाही. अदाणींचा सारथी बीणामतलब सारथ्य करणार नाही. आर.आर. आबांच्या पत्नीचा आणि चिरंजीवांचा, कन्येचा भ्रमनिरास झालेला आहे. कंबोज ने विद्या चव्हाण यांचे मागे ससेमिरा लावला आहे. तसेच अंकुश काकडेंची सखोल चौकशी केली तर साहेबांचे अनेक कारनामे चव्हाट्यावर येतील. संग्राम थोपटे आणि अनंतराव थोपटे हे तर कट्टर विरोधक आहेत साहेबांचे. अतिशय खोलवर भ्रष्टाचाराची पाळेमुळे मजबूत केलेले आहेत या काँग्रेसी मंडळींनी. आज ज्या ज्या राजकीय पक्षांचे नेते पूर्वाश्रमीचे काँग्रेसी आहेत ते या आयुष्यात तरी बदलणार नाहीत. त्यामुळे 65 च्यावर वय असणारे आता नाही बदलू शकणार, आता पिढीच बदलली पाहीजे, पण साहेब, अजितदादा, सुप्रिया सुळे, रोहीत पवार आणि पार्थ पवार जर हॉट सिटवर आहेत, कधी यांच्या मार्गात हे तीनही पक्ष (मविआ) चे अडीच वर्षातील कारनामे संकटे निर्माण करून ठेवतील माहीत नाही. पण आता उलटी गिणती सुरू झालेली आहे. नरेंद्र मोदी, अमित शाह हे दोघेही साहेबांनी दुखावले आहेत.

ते आज सत्तेत असून, प्रचंड बहूमत त्यांचे हातात आहे. त्याचवेळी सर्वच विरोधीपक्ष भांब्रावलेले आहेत. नरेंद्र मोदींची विचारसरणी आणि अमित शाह यांचे डावपेच कोणालाच कळत नाही आहेत. त्यात आता देवेंद्र फडणवीस यांची भर पडली आहे. देवेंद्र फडणवीस साहेबांविरोधात माहीती, डावपेच पुरवत आहेत. एक मात्र खरे की 2022 ते 2026 या काळात पवार साहेब खुप अडचणीत सापडणार आहेत. पवार परिवार राजकारणातून बाद होण्यास सुरुवात झाली आहे.

**पीपीएम, पुणे**

# 'या' रणनीतीनुसार विरोधक लढणार २०२४ ची निवडणूक ?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडानंतर महाराष्ट्रात महाविकास आघडीचे सरकार कोसळले आणि शिंदे गटाने भाजपसोबत युती करत सरकार स्थापन केलं. यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी २०२४ च्या निवडणुकीसाठी विरोधी पक्षांनी एकत्र येत एकजुट दाखवण्याचा सल्ला दिला आहे. येत्या निवडणुकांत किमान समान कार्यक्रम (कॉमन मिनिमम प्रोग्राम) अंतर्गत एकत्र निवडणुका लढविण्याचा विचार करू शकतो, असे ते म्हणाले आहेत.

याआधी माध्यमाशी बोलताना शरद पवारांनी म्हटले होते की, जनमत तयार करण्यासाठी बिगर भाजप पक्षांना एकत्र आणण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मात्र, वयामुळे ते कोणतीही जबाबदारी घेण्यास उत्सुक नाहीत, असे पवार म्हणाले होते. यावेळी बोलताना शरद पवारांनी केंद्रातील भाजप सरकारवर सडकून टीकी देखील केली होती. अच्छे दिन आणणे, इंटरनेटद्वारे गावे जोडणे आणि प्रत्येक घरात शौचालये, पाणी आणि वीज देणे यासह २०१४ पासून दिलेले एकही आश्वासन पूर्ण करण्यात नरेंद्र मोदी सरकार अपयशी ठरले आहे, असा टोला शरद पवार यांनी लगावला होता.

शरद पवार पुढे म्हणाल्या की, केंद्र सरकारने 2014 च्या सार्वत्रिक निवडणुकीपासून अनेक आश्वासने दिली, परंतु त्यांनी एकही आश्वासन पूर्ण केले नाही. पंतप्रधानांनी देशातील प्रत्येक व्यक्तीला घर देण्याचे आश्वासन दिले होते, परंतु सरकार आपला शब्द पाळण्यात अपयशी ठरले आहे. आता नवीन वचन दिले आहे. 2024 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था निर्माण करणार असल्याचे पवार म्हणाले. भाजप विरोधकांच्या विरोधात जे काही करत आहे, ते संसदीय लोकशाहीवर हल्ला करण्याशिवाय दुसरे तिसरे नाही, ही गंभीर चिंतेची बाब आहे. सर्व बिगर भाजपशासित राज्यांमध्ये भगवा पक्ष आमदार फोडून सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करत आहे. महाराष्ट्रातील ताजी स्थिती ही याचं उदाहरण आहे असेही पवार म्हणाले. शरद पवार म्हणाले होते की, छोट्या पक्षांना सत्तेपासून दूर ठेवण्याचा भाजपचा अजेंडा असल्याचे नमूद करून ते म्हणाले, भाजपेतर पक्षांना एकत्र आणण्यासाठी आणि भाजपच्या विरोधात जनमत तयार करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. भाजपच्या विरोधात जनमत तयार करण्यासाठी मी फक्त बिगर-भाजप पक्षांना एकत्र आणण्यासाठी मदत करेन, असे ते म्हणाले. मात्र, वयामुळे कोणतीही गंभीर जबाबदारी घेण्यास त्यांनी नकार दिला.

# हल्लेखोर सरपंचावर पत्रकार हल्लाविरोधी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची पत्रकार संघाची मागणी



आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** तालुक्यातील ताडकळस पोलिस हद्दीतील मौ.माखणी येथील दै.सामनाचे पत्रकार जनार्धन आवरगंड यांच्यावर दि.२३ ऑगस्ट २०२२ रोजी माखणी ग्रामपंचायचे सरपंच गोविंद हरीभाऊ आवरगंड व इतर यांनी मागील काळात दिलेल्या बातम्यांमध्ये नाव का टाकले नाही तसेच गावातील शाळेच्या निकृष्ट बांधकामाची माहिती का मागीतली याचा संताप मनात बाळगून ओल्या दुष्काळासंदर्मात गावचा अहवाल निरंक आल्याची चर्चा गावात करीत बदनामी का केली, असे म्हणत गावातील मारोती मंदिरासमोर सिनेस्टाईल पध्दतीने एखाद्या गुंडाला शोभेल अश्या पध्दतीने मारहाण केली. त्यांच्या या गुंडप्रवृत्तीचा निषेध करीत ताडकळस मराठी पत्रकार परिषदेच्या पत्रकारांनी ताडकळस पोलिस स्थानकाचे सहा.पो.नि. विजय रामोड यांना निवेदन देऊन सरपंच गोविंद आवरगंड यांच्यावर पत्रकार हल्ला विरोधी कायदा अंतर्गत तर ताडकळस परिसरातील 'सुनिल चिमटे मित्र परिवार' नामक व 'गण गण गणात बोते' या वाट्सअप ग्रुपवर पत्रकार जनार्धन आवरगंड यांनी खंडणी मागितती, त्यामुळे अश्या पत्रकाराला मारायलाच पाहीजे अशी चिथावणीखोर भाषेचा वापर केल्यामुळे तसेच खंडणी मागितल्या संदर्भात कुठलाही सबळ पुरावा नसताना अपप्रचार करून बदनामी केल्याप्रकरणी संबंधित वाट्सअप ग्रुप ॲडमीनसह असा खोटा प्रचार करणाऱ्या सचिन पाटील नामक व्यक्तीवर देखील सखोल चौकशी करून सायबर क्राईम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी त्यांच्या विरोधात पत्रकार हल्ला विरोधी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या ग्रामीण भागातील पत्रकारावर एखाद्या गुंडाला लाजवेल अश्या पध्दतीने हल्ला करून आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असताना त्या पत्रकाराच्या मदतीला धावून येण्याऐवजी लोकशाही मार्गाचा अवलंब करीत जनमतातून निवडून येणारे निर्लज्ज लोकप्रतिनिधी देखील हल्लेखोरांचे समर्थन करीत पत्रकारांवर खुनी हल्ले करणाऱ्या व संपूर्ण कुटुंबास जिवे मारण्याच्या धमक्या देणाऱ्याच्या बाजूने खंबीरपणे उभे राहत असल्यामुळे जिल्ह्यात गुन्हेगारी तसेच राजकीय दहशतवादी प्रवृत्ती जोमाने फोफावत असल्याचे निदर्शनास येत असून जिल्ह्यात एखाद्या सर्वसामान्य नागरीकावर अन्याय झाल्यास त्याला न्याय देण्यासाठी पोलिस प्रशासनाला फोन करणारे कमी आणि सर्वसामान्यांसह पत्रकारांवर अन्याय करणाऱ्याला वाचवण्यासाठी पोलिस प्रशासनावर दबावतंत्राचा वापर करणारे लोकप्रतिनिधी जास्त झाल्यामुळे या जिल्ह्यात लोकशाहीसह लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाची उघडपणे निर्घृण हत्या करण्याचे प्रकार होतांना दिसत आहेत.

ताडकळस पोलिस स्थानकाच्या हद्दीतील मौ.माखणी येथील दैनिक सामना या वर्तमानपत्राचे पत्रकार जनार्धन आवरगंड यांच्यावर हल्ला करणाऱ्या हलेखोरांवर कडक शासन करण्यात यावे तसेच खंडणी मागितली असा सबळ पुरावा नसतानाही अपप्रचार करून बदनामी करणाऱ्या 'सुनिल सर मित्रपरीवार' व 'गण गण गणात बोते' या व्हाटसप ग्रूप ॲडमिन सह खोटा प्रचार करणाऱ्या ग्रुप सदस्याची सखोल चौकशी करुन सायबर क्राइम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा अन्यथा तालूका पत्रकार संघटनेच्या वतीने तीव्र अंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनावर फेरोज पठाण, देवानंद नावकिकर, शिवाजी शिराळे, धम्मपाल हनवते, बाळासाहेब राउत, शमिम पठाण, शेख शेहजाद, गजानन नाइकवाडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

राजकीय लोकप्रतिनिधींच्या दबावाला बळी पडून कठोर कारवाई करण्यास टाळाटाळ ?


पत्रकार जनार्धन आवरगंड हल्ला प्रकरणी ताडकळस पोलिस स्थानकाचे सहा.पो.नि.विजय रामोड यांना लेखी स्वरूपात पत्रकार आवरगंड यांनी तक्रार दिल्यानंतर देखील सपोनि. रामोड यांनी प्रकरणाचे गांभीर्य न ओळखता थातूरमातूर एनसी दाखल करून या प्रकरणातील हल्लेखोर आरोपी सरपंच गोविंद आवरगंड यांना वाचवण्याचा केविलवाणा प्रकार केल्यामुळे संबंधित आरोपीची हिंमत कमालीची वाढल्याचे निदर्शनास येत असून या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात येवू नये याकरिता त्यांच्यावर राजकीय दबावतंत्राचा वापर झाल्याचे स्पष्ट होत आहे.

# कस्तुरबा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बनविले सुबक इको फ्रेंडली गणपती

आधुनिक केसरी न्यूज

**चापानेर :** पर्यावरणपूरक सण उत्सव साजरे करण्याचे संस्कार लहान वयातच मिळाले तर त्याची अंमलबजावणी भविष्यात अधिक प्रभावीपणे होऊ शकेल, या विचाराने सध्या शाळांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याविषयी मार्गदर्शन केले जात आहेत.

याच उपक्रमाचा भाग म्हणून साई सायली बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित संचलित श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल चापानेर येथे गणेश उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध घरगुती साधनांचा उपयोग करून गणपती बनवले व त्याची सजावट केली पर्यावरण पूरक गणपती बनवताना विद्यार्थ्यांनी अनेक कलात्मक गोष्टींचा वापर केला व आपल्या कल्पना शक्तींना वाव दिला या उपक्रमात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या गणपती मधूनच दोन गणपतीची स्थापना शाळेतील गणेशोत्सवात करण्यात आली या ठिकाणी पर्यावरण पूरक सजावट शाळेतील शाळेतील शिक्षकांनी कलाकुसरीचा उपयोग करून केली वरील उपक्रमात विशाल घुले प्रथम अर्पिता जाधव द्वितीय तर रुद्र जाधव याचा तृतीय क्रमांक आला विद्यार्थ्यांना पारितोषिके



देऊन गौरविण्यात आले यावेळी संस्था अध्यक्ष दशरथ दादा सोमासे यांच्या हस्ते श्री ची आरती करण्यात आली. विद्यार्थ्यांना यासाठी प्राचार्य कौशल्य सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य कौशल्य सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली केतन पवार, सहशिक्षक संदिप वाकडे, निलोफर शहा, सुषमा दळवी, वर्षा जाधव, मनीषा पवार जयश्री जयस्वाल, श्रुती नागवंशी, हर्षा बगाड, पूजा सोनवणे, कविता हिरे, अंकुश राठोड, सुभाष राठोड आदींनी परिश्रम घेतले.

# पूर्णेतील कायदा व सुव्यस्थेला गालबोट लागू नये याकरिता वेळीच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या धगधगत्या 'तळीराम टेंभ्यांना' आवरा....!

## शहरात यथेच्छ मद्य प्राशन करून दिवसरात्र सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करणाऱ्या 'तळीराम टेंभ्यांच्या' संख्येत वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** शहरासह संपूर्ण तालुक्यातील सर्वधर्मिय सर्वसामान्य जनता तसेच व्यापारी वर्ग सामाजिक बांधिलकीचे भान जोपासत अत्यंत शांततेत जीवन जगत असताना मात्र राजकीय दडपशहांच्या अराजक मनोवृत्तीतून पैदा झालेली 'तळीराम टेंभ्यांची' फौज किरकोळ वादाला मोठ्या जातीयवादाचे स्वरूप देत शहरासह तालुक्यातील शांतता व सुव्यस्थेला केव्हा गालबोट लावण्याचा प्रयत्न करेल हे सांगता येत नाही.

शासन दरबारी अतिसंवेदशील शहर म्हणून नोंद असलेल्या पुर्णा शहराचा पुर्व इतिहास बघितल्यास असे निदर्शनास येते की या शहरात जेव्हा जेव्हा लहान मोठ्या वादाला सुरूवात झाली त्या त्या वेळी वाद निर्माण करणाऱ्यांमध्ये मद्यपीं अर्थात 'तळीराम टेंभेच' आघाडीवर होते. धार्मिक, सामाजिक महोत्सव, सण, उत्सव असो की महापुरुषांच्या जयंती निमित्त आयोजित सार्वजनिक मिरवणूका प्रत्येक सार्वजनिक उत्सवात यथेच्छ मद्यप्राशन करून धगधगणारे 'तळीराम टेंभे' त्या सार्वजनिक उत्सवाला गालबोट लावण्यात आघाडीवर असतात.

शहरातील भरवसाहतींमध्ये हाकेच्या अंतरावर असलेल्या देशी/विदेशी दारुच्या दुकानांसह बिअरबार, रेस्टॉरंट तसेच रात्री बे-रात्री उशीरापर्यंत खानावळीच्या नावावर चालणारे धाबे परिसरातील रहिवाश्यांसह व्यापारी वर्ग तसेच जनसामान्यासाठी अक्षरशः डोकेदुखी निर्माण करीत असून शहरासह तालुक्यातील काही पडद्यामागील राजकीय दडपशहांनी विरोधकांवर दहशत निर्माण करण्यासाठी तसेच शहरात अराजकता माजवून फुकटात नायकाची भुमिका साकार करण्यासाठी जनुकाही तळीराम टेभ्यांची फौज उभी केली की काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रथमतः 'तळीराम टेंभ्यांना' मद्य इंधराची रसद पुरवून अश्या तळीराम टेंभ्याना प्रज्वलीत करायचे आणि या तळीराम टेभ्यांचा भडका उडायची वेळ आली की मग विरोधक प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार यांच्या विरोधात या धगधगत्या तळीराम टेंभ्यांचा वापर करीत शहरात आगडोंब पसरवायचा असा हा कुटील डाव रचणाऱ्या पडद्यामागील राजकीय दडपशहांसह त्यांच्या इशाऱ्यावर शहरात धुमाकूळ घालणाऱ्या 'तळीराम टेंभ्याचा' देखील कायमचा विमोड करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने पाऊल उचलायला हवी असे स्पष्ट मत सर्वसामान्य जनता व्यापारी वर्गातून व्यक्त होत आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठ परिसरातील लोकमान्य टिळकरोड, सोनार गल्ली, महाविर नगर, जुना मोंढा परिसर, बसस्थानक रोड, रेल्वे स्टेशन परिसर अश्या उच्चभ्रू वसाहतींमध्ये देशी दारू अड्डे. देशी-विदेशी दारू दुकान तसेच बिअरबार रेस्टॉरंट, खानावळीच्या नावावर चालणारे धाबे सर्वसामान्य जनता व्यापारी तसेच परिसरातील नागरीकांसाठी अक्षरशः धोकादायक झाली असून यथेच्छ दारू ढोसून तुल झालेले हे 'तळीराम टेंभे' परिसरासह शहरात सर्वत्र अफवा/अपप्रचार पसरवण्याचे काम.... अल्पसंख्याकांक जाती समुदायातील लोकांवर हल्ले करण्याचे काम.... सामाजिक कार्यकर्ते पत्रकार/प्रतिष्ठित नागरिकांना धमक्या देण्याचे काम... सार्वजनिक ठिकाणी धुमाकूळ घालीत दहशत निर्माण करण्याचे काम... अर्वाच्च जातीयवादी शिविगाळ करीत सर्वसामान्य जनतेच्या धार्मिक जातीय भावना दुःखावण्याचे काम... व्यवसायिकांना धमकावून दारू पिण्यासाठी पैशाची वसूली करण्याचे काम... महिला/शाळकरी मुलींना पाहून अश्लिल भाषेचा वापर हातवारे करण्याचे काम... किरकोळ वादाला जातीय दंगलीचे स्वरुप देण्याचा प्रयत्न करण्याचे काम... व्यापारी प्रतिष्ठित नागरीकांच्या दुचाकी घालीत उलट त्यांच्याच अंगावर धावून जात जिवे मारण्याच्या धमक्यांसह दुकानांची तोडफोड करण्याचे काम राजरोसपणे करीत असल्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाल्याचे पाहावयास मिळत असून अनेक व्यापारी शहरातून काढता पाय घेऊन आपली व्यापारी प्रतिष्ठाण इतरत्र हलवण्याच्या तयारीत आहेत संबंधित 'तळीराम टेंभ्यांचा' स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी वापर करून घेणारे पडद्या मागील राजकीय दडपशहा त्यांच्यावर गुन्हे दाखल होण्याची वेळ आली. उघडपणे त्यांना वाचवण्यासाठी समोर येतात परंतु त्यांच्या दुष्कृत्या विरोधात मात्र सर्वसामान्य जनता प्रतिष्ठित नागरीकांना सहकार्य करण्यास मात्र धजावत नाहीत त्यामुळे आपण कितीही नग्न तांडव केला तरी आपले कोणीही काही वाकड करीत नाही, हा त्यांच्या मनात झालेला भ्रम शहराच्या कायदा व सुव्यस्थेचा वेळोवेळी बळी घेत असल्याचे निदर्शनास येत आहे.

# गोल्डन स्टार इंग्लिश स्कूल व संदीपान विद्यालय येथे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** कोरोना महामारीच्या २ वर्षांच्या निर्बंधानंतर यावर्षी पुन्हा नव्याने, उत्साहाने गणेश उत्सव साजरा केला जात आहे. या अनुषंगाने संदीपान विद्यालयात व गोल्डन स्टार इंग्लिश स्कुल "शेकटा" मध्ये लिपॉक सोशल फाऊंडेशन यांच्या वतीने "इको फ्रेंडली शाडू मातीचे गणपती" मूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा उद्देश पर्यावरणपूरक व पाण्यात विरघळणारे गणपती बनवणे हा होता. पर्यावरण संवर्धनासाठी नेहमी आग्रही असलेल्या, लिपॉक सोशल फाऊंडेशन संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या या कार्यशाळेच्या प्रमुख मार्गदर्शक श्रीमती शारदा प्रेम शिंदे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व सांगितले तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसचे बनवलेले गणपती पर्यावरणास हानिकारक आहे व ते पाण्यात विरघळत नाही त्यामुळेच विसर्जनानंतर नदीकाठी मूर्तीचे अवशेष आपल्याला पाहायला मिळतात.

पीओपी जिप्सम या खनिज पदार्थापासून बनवले जाते. पाण्याच्या संपर्कात आल्यावर ते कडक होते आणि एकदा कडक झाल्यावर ते अविघटनशील बनते, त्यामुळे ते पाण्यात विरघळत नाही, पाणी दूषित होते. तसेच गणपती बनवण्यासाठी लागणारे साहित्य हानिकारक रसायनांपासून बनवले जातात जे मूर्ती सजवण्यासाठी वापरतात ते देखील पर्यावरणास हानी पोहोचवतात. त्या तुलनेत शाडू माती विघटनशील आहे. गणेशमूर्ती अवघ्या एक ते दीड तासांत ती विरघळते. तिचे पाण्यात लगेचच वहन होते. अशा पध्दतीने जर गणपती तयार केले तर गरीब कुटुंबांनाही सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे परवडणारे आहे. शारदा शिंदे यांनी अत्यंत सोप्या आणि खेळीमेळीने सर्व विद्यार्थ्यांना शाडूच्या मातीचा वापर करून आधी मुलांना प्रत्यक्ष मुर्ती बनवून दाखवली. इतक्या सोप्या पद्धतीने मुर्ती बनवता येते हे पाहून मुलांचा उत्साह खूपच वाढला. नंतर मुलांनी स्वतः च्या हाताने मुर्ती बनवण्यासाठी प्रयत्न केला. आपण बाप्पाची मुर्ती बनवू शकतो याचा विशेष आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसत होता विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात आपले "इको फ्रेंडली गणपंती" स्वतः बनविले. आम्ही शिकविलेल्या जर २०० विद्यार्थ्यांनी POP मूर्ती वापरल्या नाहीत तर आम्ही २०० मूर्ती पाण्यात विसर्जित करण्यापासून कमी केल्या आहेत. विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले गणपती घरी बसविल्यास सुमारे प्रत्येक कुटुंबातील ३०० ते ५०० रक्कम वाचणार आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी गोल्डन स्टार इंग्लिश स्कुलचे प्राचार्या स्वाती लघाने/मुळे व संदीपान विद्यालयाचे सहशिक्षक आर.व्ही. खरात, लिपॉक संस्थेचे सचिन गोरे, संघपाल इंगळे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.





# मोतीचंद कासार गुरुजी यांना जीवनगौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** जैन कासार प्रतिष्ठानचा यंदाचा जीवन गौरव पुरस्कार औसा येथील माजी मुख्याध्यापक मोतीचंद दुरुगकर (कासार) आणि जैन गुरुकुलचे माजी प्राचार्य अशोक साळवी यांना प्रसिद्ध प्लॅस्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे औचित्य साधून डॉ. लहाने यांनी दिलेल्या 'यशाचा पासवर्ड' व्याख्यानातून उपस्थितांनी चांगलाच कानमंत्र घेतला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे होते.

व्यासपीठावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष कांतीलाल नळे, संजय कंदले, सो.क्ष. कासार समाजाचे अध्यक्ष शरद भांडेकर, गोविंदराव अंधारे उपस्थित होते. प्रास्ताविक अध्यक्ष नळे यांनी, तर पाहुण्यांचा परिचय जीवराज खोबरे यांनी करून दिला. पाहुण्यांचे स्वागत कार्याध्यक्ष बाबुराव तंगा, हुकुमचंद हेसे यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ. विठ्ठलराव लहाने म्हणाले, अपार कष्ट केल्याशिवाय यश मिळत नाही. हुशार विद्यार्थ्यांना यश मिळविताना गरिबी आडवी येत नसते. प्रयत्नपूर्वक, सातत्याने आणि आत्मविश्वासने अभ्यास केलात तर कोणतेही शिखर तुम्ही सहज पादाक्रांत करू शकता. अनेक उदाहरण देत त्यांनी उपस्थितांना खिळवून ठेवले. स्वातंत्र्यपूर्व काळात कार्य केलेल्या शिक्षकांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन समाजाने वेगळा आदर्श निर्माण केल्याचे जयप्रकाश दगडे यांनी सांगितले.

मनोगत व्यक्त करताना मोतीचंद कासार गुरुजी म्हणाले, मानवी जीवनात सुख व दुःख दोन्हीही येतात. मी सात महिन्याचा असताना वडील वारले तेव्हा आईने खूप कष्ट करून आम्हाला वाढविले. आजच्या या पुरस्काराचे श्रेय आईलाच आहे. पत्नीनेसुद्धा खूप कष्ट करून मुलांना शिक्षित केले. नावाजलेल्या शाहू कॉलेजच्या प्राचार्यपदापर्यंत मुलगी पोहोचली. सर्व कुटुंबीय आनंदी आहेत. मनुष्याने दुःख पचवायला शिकले पाहिजे व सुखाचे चांगले दिवस आले म्हणजे उतल्या माजल्यासारखे वागू नये एवढीच अपेक्षा याक्षणी व्यक्त करतो. कार्यक्रमासाठी विनायक टोणगे, महावीर लाळे, माणिक व्यवहारे, संजय पाटील, प्रा.संतोष यादगिरे, स्नेहा वनकुद्रे, सोनाली तंगा यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी तर आभार अभिनंदन अगरथडे यांनी मानले.

# जि.प. पंचायत समिती निवडणूक तयारीसाठी पैठण राष्ट्रवादीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व अन्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पैठण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकारी, विविध सेल आणि सर्व अंगीकृत संघटनांच्या प्रतिनिधींची महत्वाची बैठक मंगळवारी (दि.३०) आशिर्वाद मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील यांनी मार्गदर्शन केले.

या बैठकीत प्रामुख्याने आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद आणि ग्रामपंचायत निवडणुकांबाबत चर्चा करण्यात येवून आगामी नगर परिषद, जिल्हा परिषद तथा पंचायत समितीच्या निवडणूका या कार्यकर्त्यांच्या असुन गट तट न करता कार्यकर्त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा रहा असे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील यांनी आवाहन केले.

या बैठकीला जिल्हा कार्याध्यक्ष मनोज घोडके, माजी आमदार संजय वाघचौरे, दत्तात्रय गोर्ड, तालुकाध्यक्ष आप्पासाहेब निर्मळ, शहराध्यक्ष जितु परदेशी, मा.नगराध्यक्ष अनिल घोडके, भाऊसाहेब पिसे, आप्पासाहेब गायकवाड, मा.नगरसेवक हसनौदीन कटारे, कल्याण भुकेले, ज्ञानेश घोडके, मा.जि.प.सदस्य विजय चव्हाण, डॉ.गुलदाद पठाण, विशाल वाघचौरे, किशोर दसपुते, शेखर देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# व्यापारी संघटनेतर्फे आयोजित मॅरेथॉन स्पर्धेला स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा. :** भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत वर्षानिमित्त व मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा होणाऱ्या राष्ट्रीय खेळ दिवसाचे औचित्य साधत मी धावतो देशासाठी... देशाच्या अखंडतेसाठी व एकात्मतेसाठी या संकल्पनेनुसार येथील व्यापारी संघटनेच्या वतीने भव्य मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली होती.

दि.27 ऑगस्टला सकाळी नऊ वाजता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा प्रवेश अर्ज गुगलवर ऑनलाईन असल्याने विनाशुल्क ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये नागपूर, नाशिक, अकोला, संभाजीनगर, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, जळगाव खान्देश अशा विविध ठिकाणच्या 212 स्पर्धकांनी भाग घेतला. ही स्पर्धा पाच किलोमीटरची होती. या स्पर्धेचे प्रथम बक्षीस रुपये 5555, द्वितीय 4444, तृतीय 3333, चतुर्थ बक्षीस 2222 व पाचवे बक्षीस 1111 तसेच उत्तेजनार्थ 500 रोख बक्षीस असून त्यासोबत सर्व विजेत्या स्पर्धकांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र बक्षीस देण्यात आले. ही बक्षिसांची रक्कम व्यापारी संघटनेच्या सदस्यांच्या प्रतिष्ठानच्या नावाने होती तर यासाठी लागणारा खर्च व्यापारी बंधूंनी स्वतःच्या संघटनेने देणगीदारांच्या वतीने खर्चाचा भार उचलला. या स्पर्धेचे पंच म्हणून प्रविण डाबरे, प्रमोद येऊल, दिपक देशमुख, राऊत यांनी काम पाहिले. स्पर्धेत बक्षीस घेतलेले स्पर्धक प्रथम आसिफ खान राहणार आग्रा हा स्पर्धक सर्वात कमी वेळात म्हणजे फक्त बारा मिनिट 46 सेकंदात अंतर पार करून प्रथम आला. त्याला 5555 व स्मृतीचिन्ह, द्वितीय क्रमांक भूपेंद्रसिंह नाशिक 4444 रू रोख व स्मृतीचिन्ह, तृतीय बक्षीस सुनील कुमार नाशिक 3333 रोख व स्मृतिचिन्ह, चौथे बक्षीस प्रदीप दलासिंह राजपूत संभाजीनगर रोख 2222 व स्मृतिचिन्ह पाचवे बक्षीस दीपक सोमवाणी दिपनगर अकोला 1111 रुपये व स्मृतिचिन्ह अशी बक्षिसे देण्यात आले. तर यामध्ये झोपे हे सेवानिवृत्त शिक्षकाने स्पर्धेत भाग घेतल्याने सर्वात वयस्कर स्पर्धक म्हणून प्रोत्साहन पर रोख पाचशे रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले.




शो मच ठरली आकर्षणाचा केंद्र बिंदू

या स्पर्धेआधी शहरातील मुख्य मार्गावरून हातात तिरंगा घेऊन सर्व व्यापारी संघटनेचे सदस्य तसेच गावातील नागरीक व पत्रकार धावले. मी धावतो देशासाठी... देशाच्या एकात्मतेसाठी व अखंडतेसाठी ही संकल्पना सार्थ ठरवली. मॅरेथॉनला ठाणेदार सुनील अंबुलकर यांनी हिरवी झेंडी दाखवली. तर बक्षीस वितरण समयी व्यापारी संघटनेच्या वतीने देणगी दात्यांचे सत्कार करण्यात आले. ठाणेदार सुनिल अंबुलकर यांनी स्पर्धकांमध्ये आपल्या ओजस्वी वाणीने स्फूर्तीदायक वक्तव्य करून नियोजनाबद्दल संघटनेचे कौतुक केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी व्यापारी संघटनेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# संभाजी ब्रिगेड आगामी निवडणुकांच्या रिंगणात उतरून राजसत्ता काबीज करणार

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** संभाजी ब्रिगेड व शिवसेना युती झाल्यानंतर प्रथमच संभाजी ब्रिगेड बुलढाणा जिल्हा बैठक पार पडली. या बैठकीला संभाजी ब्रिगेड प्रदेश कार्याध्यक्ष डॉ.गजानन पारधी, विभागीय अध्यक्ष इंजी.गजानन भोयर, बुलडाणा जिल्हाध्यक्ष योगेश पाटील प्रमुख उपस्थितीत होते. या बैठकीत संभाजी ब्रिगेडची भविष्यातील वाटचालीबद्दल वरिष्ठांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

यामध्ये संभाजी ब्रिगेड शिवसेना युती, आगामी निवडणुका, पक्ष बळकटीसाठी करावयाचे नियोजन याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच संभाजी ब्रिगेड व शिवसेना युती झाल्याने बऱ्याच लोकांच्या पोटात गोळे उठत आहे कारण त्यांना माहित आहे की संभाजी ब्रिगेडची ताकाद काय आहे तर व आमच्या युतीवर टीका करणाऱ्यांनी हे समजून घ्यावे की संभाजी ब्रिगेड व शिवसेना युती हे वैचारिक युती आहे जे की प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचारांवर एकत्रित आली आहे, असे संभाजी ब्रिगेड नांदुरा तालुकाध्यक्ष अमर रमेश पाटील यांनी म्हटले. या युतीमुळे संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांना नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. महत्त्वाचे म्हणजे या बैठकीला शिवसेना जिल्हाप्रमुख वसंतराव भोजने, उपजिल्हाप्रमुख संजय जाधव यांनी उपस्थिती लावत शिवसेना व संभाजी ब्रिगेड मिळून एकदिलाने काम करू असे वसंतराव भोजने यांनी म्हटले. बैठकीत त्यांचा सत्कार वरिष्ठांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी संभाजी ब्रिगेडच्या मावळ्यांनी जोरदार घोषणा देऊन बैठकीमध्ये नवचैतन्य निर्माण केले. या जिल्हा बैठकीला संभाजी ब्रिगेड जिल्हा सचिव शरद पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष मंगेश सोळंके, जिल्हा कार्याध्यक्ष एस.पी. सांबारे, जिल्हा संघटक डॉ.सागर महाजन, नांदुरा तालुकाध्यक्ष अमर रमेश पाटील, मोताळा तालुकाध्यक्ष गणेश शिंदे, तालुका उपाध्यक्ष भागवत देशमुख, खामगाव तालुकाध्यक्ष कृष्णा वडोडे, मलकापूर तालुकाध्यक्ष राहुल वणारे, शेगाव तालुकाध्यक्ष विठ्ठल अवताडे, जळगाव तालुकाध्यक्ष रामा रोठे, दत्ता आटोळे, स्वप्नील उगले, नांदुरा तालुका उपाध्यक्ष दिलीप कोल्हे, तालुका उपाध्यक्ष अमोल पाटील, तालुका कार्याध्यक्ष संतोष सोळंके, तालुका प्रसिध्दीप्रमुख प्रदीप कुटे, तालुका संपर्कप्रमुख सचिन गणगे, निमगाव जिल्हा परिषद सर्कलप्रमुख वैभव पारस्कार, नांदुरा शहराध्यक्ष हिमांशू अवचार, इसापूर शाखाध्यक्ष श्याम काळे, इसापूर शखा सचिव मधुसूदन पूंडकर, भोटा शाखाध्यक्ष विनायक पारस्कार व इतर बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष योगेश पाटील यांनी केले. तर बहारदार सूत्रसंचालन डॉ.शरद पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन संभाजी ब्रिगेड मोताळा तालुकाध्यक्ष गणेश शिंदे यांनी केले. बैठक यशस्वी करण्यासाठी संभाजी नांदुरा तालुकाध्यक्ष अमर पाटील तसेच तालुक्यातील पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.





बीड : NMMS परीक्षेत स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयातील दोन विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले. त्याबद्दल मुख्याध्यापक संजय विभूते व शालाबाह्य परीक्षा प्रमुख अभय गवई यांचा संस्था प्रशासकीय अधिकारी तथा माजी सहकार्यवाह चंद्रकांत मुळे, शिक्षक प्रतिनिधी तथा विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, प्राथमिक शालेय समिती अध्यक्ष सतीश कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# एरंडवण ज्येष्ठ नागरिक संघातर्फे एअर मार्शल (निवृत्त) प्रदीप बापट यांचे अग्निपथ योजनेवर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बुधवार दि.२४ ऑगस्ट रोजी एयर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) यांचे अग्निपथ या ज्वलंत विषयावर ज्येष्ठ नागरिक संघ एरंडवणे च्या सभागृहात अभ्यासपूर्ण भाषण झाले. एअर मार्शल प्रदीप बापट यांनी १९८२ मध्ये भारतीय वायु दलात प्रवेश घेतला होता. २६ जानेवारी २०२० मध्ये त्यांना राष्ट्रपतीच्या हस्ते परम् विशिष्ट सेवा पदक पण देण्यात आले आहे.

भारतीय सैन्यदलात यापुढील होणारी नव्या व युवा सैनिकांची भरती अधिकाधिक प्रशिक्षणावर आधारित व सक्षमतेच्या आधारावर करण्यासाठी 'अग्निपथ' योजनेची घोषणा नुकतीच करण्यात आली. भरती झाल्यानंतर यांना अग्निवीर म्हटले जाईल. या योजनेची घोषणा होऊन त्याचा तपशील पडताळून पाहण्यापूर्वीच 'अग्निपथ'ला व्यापक व हिंसक विरोध देशातील काही विशिष्ट क्षेत्रातून होताना दिसला. सैन्यदलाच्या तिन्ही शाखांमधील लष्करी करिअर हे धाडसी तरुणांसाठी आवडते व आव्हानपर असले तरी, संबंधित वा इच्छुक युवा-उमेदवारांना सैन्यदलात सामावून घेऊन नोकरी देणे हा उद्देश कधीच नव्हता, असे करणे शक्य ही नाही. तपशिलासह सांगायचे झाल्यास नव्या योजनेअंतर्गत ४६ हजार अग्निवीरांची चार वर्षे कालावधीसाठी निवड करण्यात येईल, चार वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येक अग्निवीर उमेदवाराला ११.७२ लाख रुपयांची राशी देण्यात येईल. हे सर्व आयकरपासून मुक्त असेल. यापैकी २५% अग्निवीरांना त्यांच्या निवडीच्या आधारे सैन्यदलात निवड करण्यात येईल व बाकी अग्निवीरांना त्यांचे कौशल्य व प्रशिक्षणाच्या आधारे इतरत्र योग्य नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतील.

राष्ट्रीय स्तरावर असणाऱ्या दहा अर्धसैनिक दल संस्थांमध्ये आणि त्याखालोखाल केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात, रेल्वे सुरक्षा दल, आसाम रायफल, सीमा सुरक्षा दल, इंडो-तिबेट सुरक्षा दल यामध्ये सशस्त्र सैनिक असतात. या विविध अर्धसैनिक दलांमध्ये दरवर्षी नव्या जवान-सैनिकांची आवश्यकता असते व ही आवश्यकता उर्वरित अग्निवीरांना सशस्त्र दलात संधी नक्कीच उपलब्ध करण्यात येईल. गृहमंत्रालयाने अग्निवीरांना वयोमर्यादेची अट शिथिल करण्याच्या जोडीलाच दहा टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली आहे. संरक्षण मंत्रालयाने तटरक्षक दलाशिवाय संरक्षण मंत्रालयांतर्गत असणाऱ्या प्रमुख व मोठ्या २८ उत्पादन आस्थापनांमध्ये अग्निवीरांसाठी दहा टक्के राखीव जागा ठेवण्याचे जाहीर केले आहे. याशिवाय अग्निवीरांसाठी शैक्षणिक व कौशल्यपर विकासाच्या योजना हाती घेण्यात आल्या आहेत. यामध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या अग्निवीरांना बारावीची पात्रता पूर्ण करण्यासाठी विशेष शैक्षणिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे, इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश करता येणे व कौशल्य विकास मंत्रालयातर्फे विविध कौशल्य विकासाला चालना देणे या आणि यांसारख्या उपक्रम-पुढाकारांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. त्याच्याच जोडीला सार्वजनिक क्षेत्रातील बँकांतर्फे अग्निवीरांना उद्योजक बनविण्यासाठी आर्थिक सहकार्यासह प्रोत्साहन योजनेचा नव्याने समावेश करण्यात आला आहे.



अग्निवीरांना साडे सतराच्या वयापासून एकवीस वर्षाच्या वयापर्यंत संधी मिळणार आहे. त्याशिवाय कठीण भागात काम करताना अतिरिक्त भत्ते आणि सेवेत असताना मृत्यु झाल्यास एक कोटी रकमेचा विमा पण केला जाणार आहे. कोणती ही योजना परिपूर्ण नसते आणि काळाप्रमाणे त्यात आवश्यक बदल घडत असतात. त्यामुळे ही योजना निश्चितच खुप उत्तम आहे. साडे सतरा ते एकवीस वयोगटातील तरुणांना भरती करून आर्मीचे वय कमी करून २२ ते २८ वर आणायचे हा अग्निपथ योजनेचा मुख्य हेतू आहे. एअर मार्शल प्रदीप बापट यांनी उपस्थित श्रोत्रांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे पण दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नागरिक संघाचे (एरंडवण) अध्यक्ष श्रीकांत पुराणिक हे होते. संस्थेचे सहकार्यवाह मुकुंद जोशी यांनी प्रदीप बापट यांचा परिचय करून दिला तर कार्यवाह उर्मिला शेजवळकर यांनी त्यांचे स्वागत केले.

# लोणार तालुका शिवसेनेच्या प्रमुख नियुक्त्या जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** मतदार संघाचे आमदार, खासदार पाठोपाठ लोणार तालुक्यातील शिवसेना पदधिकाऱ्यांनी ही मुळ शिवसेना सोडल्यामुळे रिक्त झालेल्या तालुकाप्रमुख, शहरप्रमुख पदावर नविन नियुक्त्या पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहिर केल्या असून शिवसेनेच्या लोणार तालुकाप्रमुख पदावर संदीप मापारी तर शहर अध्यक्षपदी गजानन जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

लोणार तालुका शिवसेनचा बालेकिल्ला असुन राज्यात घड़लेल्या राजकीय घडामोडीमुळे मात्र तालुक्यात शिवसेनेचे संघटन कमकुवत पडले होते. मतदार संघाचे आमदार डॉ.संजय रायमुलकर आणि खासदार प्रतापराव जाधव यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा.बळीराम मापारी यांनी शिंदे गटात जाण्याचा घेतलेल्या निर्णयामुळे तालुका पातळीवर शिवसेना पक्षात मोठे खिंडार पडले होते. संघटन स्तरावर पक्ष सावरण्याचे काम जोमात सुरु झाले असून यासाठी प्रत्येक ठिकाणी शिवसेने कार्यकर्त्याचे मेंळावे घेवून निष्ठावान शिवसैनिकांना एकत्र करण्याचे काम सुरु केले आहे. आता पुन्हा एकदा संघटनेत नव्या दमाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करून संघटनेला बळ देण्याचे काम पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. सदर नियुक्ती शिवसेनेचे जिल्हासंपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेड़ेकर, जिल्हाप्रमुख जलिंदर बुधवत, उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे यांच्या नेतृत्वात करण्यात आल्या असल्याचे यावेळी तालुकाप्रमुख संदीप मापारी यांनी संगीतले.



# नगर परिषद निवडणूक कॉंग्रेस स्वबळावर लढणार : डॉ. मोहम्मद नदीम

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** येत्या काळातील नगरपरिषद पुसदची निवडणूक कॉंग्रेस पक्ष हा स्वबळावर लढणार असून त्याची जय्यत तयारी करण्यात येत आहे. प्रत्येक वेळी कॉंग्रेस नगरपालिकेची किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ह्या स्वतंत्रपणेच लढवत असते. त्याप्रमाणे याही वर्षी स्वतंत्रपणेच लढण्याचा निर्धार प्रदेश कॉंग्रेसचे चिटणीस डॉ. नदीम यांनी जाहीर केला. ते डी.एन. कॉम्प्लेक्सच्या हिरवळीवर आयोजित पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलत होते. यावेळी पक्षाचे पुसद न.प. निवडणुकीसाठीचे निरीक्षक द्वय माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर आणि नगरपंचायत महागावचे माजी उपाध्यक्ष शैलेश कोपरकर हे उपस्थित होते. दोन्ही निरीक्षकांनी स्थानिक कार्यकर्त्यांशी येत्या नगरपरिषद निवडणुकीबाबत चर्चा विनिमय केला असून कार्यकर्त्यांच्या भावना ते श्रेष्ठांनाही कळवणार आहेत. त्यांनी पक्षाच्या आदेशाची सविस्तर माहिती देवून पुढील निवडणकीबाबत मार्गदर्शन केले.

सदर बैठकीला पक्ष निरिक्षक प्रकाश पाटील देवसरकर, शैलेश कोपरकर, प्रदेश सचिव डॉ. मोहम्मद नदीम, तालुका अध्यक्ष अजय पुरोहित, शहर अध्यक्ष ज़िया शेख, जिल्हा महासचिव सैय्यद इस्तियाक, अशोकबाबा ऊँटवाल, जिल्हा उपाध्यक्ष अनिल शिंदे, गजानन देशमुख, तालुका महिला अध्यक्ष प्रा. संध्याताई कदम, अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष अमजद खान, शहर अध्यक्ष नन्हे खान, विठ्ठलराव दुपारते, जब्बार लाखे यांच्यासह अनेक कॉंग्रेस कार्यकते हजर होते.

# जाळीचा देव येथे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव उत्साहात साजरा

## कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांची जाळीचा देवला विकासाची चालना देण्याची ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जाळीचादेव हे तिर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाणारे राज्यात प्रसिद्ध आहे. दि.२९/८/२२ सोमवार रोजी कलीयुगातील परब्रम्ह परमेश्वर भगवान श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन म्हणून मोठ्या थाटामाटात सायंकाळी आठ वाजता मिरवणूक काढून साजरा करण्यात आला. दुपारी बारा ते चार महाप्रसादाचे आयोजन पुजारी मंडळी यांच्याकडून करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ हजारो भाविक भक्तांनी घेतला. सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव निमित्त श्री क्षेत्र जाळीचा देव येथे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तिर्थस्थानास देवास मंगल स्नान घालण्यात आले. तदनंतर ध्वजारोहण पारध येथील पोलीस निरीक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. तर धर्मसभा अध्यक्ष मेहकरकर बाबा महानुभाव यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास कृषिमंत्री अब्दुल सत्तार भेट देऊन भरघोस निधी देणार असल्याची ग्वाही दिली. नैसर्गिक सानिध्यात सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले जळीचादेव संस्थान येथे भाविकांसाठी पायाभूत व मूलभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने सर्वोतोपरी मदत करू, अशी ग्वाही कृषिमंत्री



अब्दुल सत्तार यांनी जाळीचादेव येथे विश्वस्त व गावकऱ्यांशी बोलताना दिली. जाळीचादेव संस्थान येथे विकास कामे करताना

येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आमदार संतोष दानवे यांच्यासह वनविभागाचे अधिकारी, संस्थानचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या दालनात बैठक घेवून या बैठकीत जाळीचादेव संस्थान येथे संरक्षण भीत व विकास कामे करण्याबाबतचा तिढा सोडवू असे मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले. यावेळी जाळीचादेव संस्थानच्या वतीने ना. अब्दुल सत्तार यांचा स्वागत सत्कार करण्यात आले. तसेच येथील विश्वस्थानी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन मंत्री अब्दुल सत्तार यांना दिले. तर कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सवाच्या भाविकांना शुभेच्छा दिल्या. कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी मंदिर परिसराची पाहणी केली. त्यानंतर येथील श्री. चक्रपाणी आश्रमास त्यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी जाळीचादेव येथील सरपंच सुधाकर उदरभरे, अमृतराज मेहकरकर, राजू पुजारी, बाळू पुजारी, वसंतराव पुजारी, दामुअण्णा पुजारी, अनिल पुजारी, सुरेश पुजारी, प्रा.बप्पासाहेब उदरभरे, अजित पुजारी, सचिन पुजारी, रमेश मानेकर व माजी सभापती धरमसिंग चव्हाण, सावळदबारा येथील माजी सभापती शिवाआप्पा चोपडे, सुरेश चव्हाण सामाजिक कार्यकर्ते (घाणेगांव तांडा), गणेश खैरे, ज्ञानेश्वर रामभाऊ वारंगणे आदींसह पुजारी मंडळी, भाविक भक्त, गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वाहेगाव तंटामुक्ती अध्यक्षपदी बोबडे



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील वाहेगाव येथील तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी रामेश्वर प्रल्हादराव बोबडे यांची ग्रामसभेत एकमताने ठराव मंजूर केल्याने बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने नवनिर्वाचित तंटामुक्ती अध्यक्ष रामेश्वर बोबडे यांचा वाहेगाव विविध विकास कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अशोक बोबडे पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी उपसरपंच दत्ताअण्णा सोनवणे, ग्रामसेवक सागर डोईफोडे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी बोबडे, नितीन बल्हाळ, कासम शेख, राजु बोबडे, माणिक मिसाळ, संदिपान शिंदे, भगवान सोनवणे, सोपान बोबडे, शाम सोनवणे, संजय नवले, अशोक बोबडे, कैलास बोबडे, संतोष सोनवणे, बाबासाहेब शिंदे, बाळु बोबडे, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय मजदूर संघाच्या राष्ट्रीय महामंत्रीपदी रवींद्र हिमते यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारतीय मजदूर संघाच्या भुवनेश्वर आडिसा



26, 27, 28 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या अखिल भारतीय कार्य समितीच्या बैठकीत नागपूर (महाराष्ट्र) येथील भारतीय मजदूर संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते रवींद्र हिमते यांची भारतीय मजदूर संघाच्या राष्ट्रीय महामंत्री पदावर सर्वानुमते निवड करण्यात आली. यापूर्वी महामंत्री या पदावर कार्यरत असलेले बिनय कुमार सिन्हा यांनी प्रकृती अस्वस्थतेमुळे जून 2022 मध्ये महामंत्री पदाचा राजीनामा दिला होता. त्यांचा राजीनामा मंजूर केल्यानंतर रविंद्र हिमते यांच्याकडे राष्ट्रीय महामंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली.

रवींद्र हिमते हे मूळचे नागपूर येथील असून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात विभागीय लेखापाल म्हणून सेवानिवृत्त झाले आहे. भारतीय मजदूर संघातील गेल्या 30 वर्षापासून कार्यरत असून नागपूर जिल्हा मंत्री, विदर्भ प्रदेश पदाधिकारी, परिवहन मजदूर महासंघ, भारतीय मजदूर संघ केंद्रीय सचिव, उद्योग प्रभारी ते राष्ट्रीय महामंत्री असा त्यांचा भारतीय मजदूर संघातील प्रवास आहे. मनमिळावू स्वभाव, दांडगा जनसंपर्क, देशभर प्रवास ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. अनिल ढुमणे, महामंत्री मोहन येणुरे, प्रदेशाचे सर्व पदाधिकारी, सर्व उद्योग व जिल्ह्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या वतीने रविंद्र हिमते यांचे हार्दिक अभिनंदन आणि त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## वनविभागाच्या वनपाल सुभाष नांगरेंचा अजब कारभार; स्वत: बनले वैद्यकीय अधिकारी

### आत्महत्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने केली सारवासारव

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** गेल्या काही दिवसापासून वेगवेगळ्या विषयात चर्चेत असलेल्या पिशोर वनपरिमंडळ कार्यालयाचे वनपाल नागरे यांनी अजब कारभार करून दाखवला आहे. तालुक्यातील पळशी येथील पासचे सागवान साहित्य बनवणाऱ्या व्यापाऱ्याकडून रोख तीस हजार रुपये घेतले व नंतर सागवानी सोफा, पलंग, मंदिराची मागणी वनपाल नागरे करत असल्याने त्रस्त सागवान योगेश देवग या व्यापाऱ्याने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने वन विभागाची चांगलीच धांदल उडवली.

या व्हिडीओमध्ये योगेश म्हणत आहेत लग्न सराईत माझ्याकडे ग्राहकांची खुप गर्दी होती. माझा धंदा पाहून नागरे मला धमकी द्यायचे तु धंदा कसा करतो असे म्हणून पैशाची मागणी करून माझ्याकडून रोख तीस हजार रुपये घेतले. माझ्याकडे पैसै नव्हते मी व्याजाने काढून दिले. तरी ही मला नागरे हे सोफा दे, पलंग दे, मंदिर दे, अशी मागणी करतच राहिले यामुळे त्रस्त होऊन आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला, असा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने वनविभागाच्या कारभाराबाबत तालुक्यात चांगलीच




चर्चा रंगली.

आता हे प्रकरण अंगलगट येणार म्हणून नागरे व चार जण सोबत घेऊन सागवान व्यापारी योगेशकडे धाव घेतली परंतु योगेशने काही थारा लागु दिला नाही व तालुक्यात चर्चा रंगल्याने वरिष्टांचाही बहुतेक दबाव वाढला असावा मग नागरेंनी मध्यस्थी करून प्रकरण निपटारा करण्याचे ठरवले व योगेशकडून एक पत्र लिहून घेतले. माझी मनस्थिती बरी नव्हती म्हणून मी त्यांच्या विरोधात बोललो असेही पत्र लिहून घेतले. मनःस्थिती बरे नव्हते याचा अर्थ तो मनोरुग्ण आहे. मनोरुग्ण असल्याचे सर्टिफिकेट देण्याचा नागरे यांना अधिकार आहे का ते स्वतः वैद्यकीय अधिकारी झाले असेही चर्चाला उधाण येत आहे. व्हिडिओ व्हायरल झाला त्याच दिवशी का पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली नाही नंतर का केली असाही प्रश्न पडला आहे.

हा विषय वनपरिक्षेत्र कन्नड कार्यालयापर्यंत चर्चा होती मग यांनी नागरेंना पाठीशी घातलं का? असाही प्रश्न नागरिकांना पडला आहे. आंधळं दळतंय कुत्र पीठ खातं असं तर नाही ना असेही चर्चाला उधाण येत आहे. याकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देणार का ? तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### हनिमून...

आधुनिक केसरी

भारतीय परंपरेमध्ये लग्नबंधनाला अनन्यसाधारण असं महत्त्व आहे जन्माला आलेला प्रत्येक पुरुष आणि स्त्री यांच्या शारीरिक गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्या देशात लग्न या सामाजिक चौकटीचे पालन करतात. त्याला अनेक कारण आहेत त्यात मी जात नाही. मात्र मी जसे नेहमी म्हणतो, की सेक्स या भावनेवर नेहमी स्थळ, काळ वेळ आणि संस्कृती यांचे बंधन असायलाच हवं. नाहीतर समाजात स्वैराचार वाढेल आणि म्हणूनच आपल्या पूर्वजांनी ही एक समाजमान्य अशी चौकट आपल्याला आखून दिली आणि माझा विश्वास नव्हे तर माझी खात्री आहे की या चौकटीत राहून सेक्ससारख्या अतिशय गोड आणि सुखावह भावनेचा आनंद स्त्री-पुरुष दोघोंनाही घेता येतो. एका तरुण जोडप्याचे लग्न झालं की अनेक प्रथा, परंपरा पाळल्या जातात त्याचप्रमाणे हनिमून ही एक प्रथा आहे जी प्रथा गेल्या अनेक वर्षापासून आपला समाज पाळत आलेला आहे आता समाज, जाती, धर्म, गरीब, श्रीमंत याप्रमाणे हनिमुन साजरा करण्याची पद्धत बदलते. मात्र तो साजरा होतो हे निश्‍चित.

**हनिमून हे नाव कसे पडले?**

हनी म्हणजे मध... मध म्हणजे गोडवा... आणि मून म्हणजे चंद्र... आता हे दोन शब्द एकत्र केले की होते हनिमून... त्याचा अर्थ असा आहे की, नवपरिणीत जोडप्यातला गोडवा, प्रेम, एकमेकांबद्दलचे मानसिक आणि शारीरिक आकर्षण मधातल्या गोडव्याप्रमाणे वाढावं आणि ते सुद्धा चंद्र जसा कले कलेने वाढतो तसं ते प्रेम वाढावं, बहरावं याकरिता हे जोडपं आपल्या कुटुंबापासून, नातेवाईकांपासून दूर काही दिवस, काही काळ एकत्र राहतं आणि सगळं विसरुन एकरूप होतं. अगदी मनानं आणि शरीराने याला म्हणतात हनिमून... तुम्हाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल ही प्रथा आल्याकडे सुमारे इ.स. १५०० ते १८०० या काळा पासून सुरू आहे आणि त्याचे दाखले विविध पद्धतीने आपल्याला शास्त्रांमध्ये पाहायला मिळतात...

आपल्याकडे फार पूर्वीपासून ॲरेंज्ड मॅरेज करण्याची पद्धत आहे ज्याला दोन कुटुंबांनी एकत्र येऊन ठरवलेला विवाह किंवा लग्न असे म्हणता येते. यात पूर्वी अनेक वेळा असे व्हायचं की मुलाला मुलगी किंवा मुलीला मुलगा सरळ लग्नमंडपातच दिसायचा. ती दोघे एकमेकांसाठी पूर्ण अनोळखी मग लग्न झाल्यानंतर त्यांनी एकमेकांना जाणून घ्यावं, त्यांच्यातील अंतर कमी होऊन एकमेकांबद्दल प्रेम निर्माण व्हावं आणि मग त्यांच्या संसाराला सुरुवात व्हावी असा काहीसा उद्देश या हनिमूनच्या पाठीमागे पूर्वीच्या लोकांचा असावा असं म्हणायला हरकत नाही. परत मी सांगेन की समाज, धर्म, जात गरीब आणि श्रीमंत यानुसार यात बदल नक्कीच असतात. मात्र त्यापाठीमागची भावना सारखीच असते. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

## सामाजिक दायित्व आणि व्यावसायिक हित यामध्ये संतुलनासाठी 'स्व'च्या त्रिसूत्रीचा अवलंब आवश्यक : डॉ. वडनेरे

आधुनिक केसरी न्यूज

**माउंट आबु :** सामाजिक दायित्व आणि व्यावसायिक हित मध्ये संतुलनासाठी "स्वः अनुशासन, स्वः नियंत्रण आणि



स्वः नियमन" या त्रिसूत्रीचा अवलंब आवश्यक असल्याचे प्रतिपादन माउंट आबु येथे राष्ट्रीय मीडिया संमेलनात डॉ. सोमनाथ वडनेरे, महाराष्ट्र समन्वयक यांनी केले. माध्यमांच्या व्यावसायिक हितसंबंधांना त्याच्या सामाजिक जबाबदारीसह संतुलित करणे, (बॅलन्स मिडिया कमर्शिअल इंटरेस्ट विथ सोशल रिस्पॉन्सबीलिटी) या विषयावर ते बोलत होते. ब्रह्माकुमारीज मीडिया विंग आयोजित चार दिवसीय नॅशनल मीडिया कॉन्फरन्समध्ये भारत, नेपाल येथून आलेले जवळपास 2000 मिडिया कर्मचारी पत्रकाराची उपस्थिती आहे. या कॉन्फरन्स च्या दुसऱ्या सत्रात "माध्यमांच्या व्यावसायिक हितसंबंधांना त्याच्या सामाजिक जबाबदारीसह संतुलीत करणे" या विषयावर डायलॉग सेशन आयोजित करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते मार्गदर्शन म्हणून महाराष्ट्रातील जळगाव येथील डॉ.सोमनाथ वडनेरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी के.श्रीनिवास, डॉ.के. आचार्य, डॉ. फिरोज खान, डॉ.भगत, डॉ. अबिद अली, के.के.राव यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. बी.के.मेघा यांनी सूत्रसंचालन केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in